# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २७.१०.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक २७ ऑक्टोबर २००६ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तणवानी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी १२.५० वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली. सभेला प्र.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व  खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०८. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.सौ.आशन्ना लक्ष्मी शंकर
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१९. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२१. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२२. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२५. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२६. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२९. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३०. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३१. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३२. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव

३३. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३४. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३५. स.स.श्री.खान निसार मो.खान
३६. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३७. स.स.सौ.राऊत छाया विलास
३८. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
३९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४०. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४१. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४२. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४३. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४४. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४५. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
४६. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४७. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
४८. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
४९. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५०. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५१. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५३. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५४. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५५. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५६. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५७. स.स.श्री.खुडे विजय किसन
५८. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५९. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६०. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६१. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६२. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६३. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६४. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६५. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६६. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६७. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६८. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
६९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७१. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७२. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७३. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७४. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ

७५. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग

७६. स.स.सौ.जैन अल्पा विकास

७७. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस

७८. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव

०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल

०३. स.स.श्री.राजेश व्यास

**<u>चर्चा :</u>**

श्री. संजय जगताप : वार्ड क्र ४६ च्या नगरसेविका पै.श्रीमती आबेदा बेगम यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झालेले आहे त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.संजय सिरसाट
श्री.अ.साजेद अ.सत्तार } : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : सर्वांनी श्रध्दाजंलीसाठी ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहावे.

याच वेळी स.सदस्या पै.श्रीमती आबेदा बेगम यांचे दुःखद निधनानिमित्त सभागृहात ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.सय्यद खुसरो : शुक्रवारी नमाजसाठी जावे लागते त्यामूळे या दिवशी सभा आयोजित करू नये अशी विनंती आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : दुपारी ३.०० च्या नंतर सभा आयोजित करण्यास हरकत नाही.

श्री.संजय सिरसाट : काही स.सदस्यांना नमाजसाठी जायचे असल्याने विषयपत्रिका घेवून सभा लवकर संपवावी तहकूब करू नये.

श्री.नारायण कुचे : मुंकुदवाडी येथील झालेले अतिक्रमण काढण्याचे मा.न्यायालयाचे आदेश असतांना ही काढले नाही. मागिल बैठकीत १५ दिवसाच्या आत काढण्याचे आदेशीत केले होते काढले नाही.

श्री. बाबासाहेब डांगे : मागिल चार महिण्यापासून आम्ही सदस्य या संदर्भात बोलत आहे पत्रही दिले तसेच मागिल बैठकीत आपण १५ दिवसाची मूदत दिली होती अद्याप अतिक्रमण काढले नाही. सभा तहकूब करून पाहणी करावी. प्रशासन समोरच्या व्यक्तीला न्यायालयात जाण्यास वेळ देत आहे.

मा. महापौर : मागिल बैठकीत आदेशीत केले होते, का काढले नाही. याचा संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : माझ्या वार्डात बिल्डर ओपन स्पेसवर अतिक्रमण करून एका खोलीचे बांधकाम केलेले आहे. तक्रार देवूनही कार्यवाही होत नाही. याचा खूलासा करण्यात यावा.

मा. महापौर : शहरातील कोणत्याही भागात महानगरपालिकेच्या ओपनस्पेसवर जर कूणी अतिक्रमण करीत असेल, ते नंदनवन कॉलनीत असेल किंवा इतर कूठेही असेल संबधीतावर गुन्हा नोंदविण्यात यावा. जेवढे खूल्या जागा आहेत, त्यांना बजेट मध्ये तरतूद करून या जागेला संरक्षित भिंती बाधण्याची कार्यवाही करण्यात यावी.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : संबधीत व्यक्तीने ओपनस्पेसवर अतिक्रमण केले.कुणाच्या मालकीचा प्लॉट असेल तरीही विना परवानगी काम करू शकत नाही. ताबडतोब गुन्हा दाखल करण्यात यावा. १०'×१०' ची खोली बांधलेली आहे.नसता मी उपोषणास बसेल.

मा.महापौर : महानगरपालिकेची खूली जागा असेल व अतिक्रमण होत असेल तर ताबडतोब तोडावे व गुन्हा दाखल करावा.

| | |
|---|---|
| श्री.बाबासाहेब डांगे | : मुंकूदवाडी येथील अतिक्रमणाच्या बाबतीत खूलासा घेण्यात यावा. संबधीताला मा.न्यायालयात जाण्यासाठी प्रशासन वेळ देत आहे. |
| श्री.नारायण कुचे | : महानगरपालिकेचे निलंबित अधिकारी आहे, म्हणून कार्यवाही करीत नाही. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :सभा आयोजित बाबत सूचना सर्व अधिकाऱ्याना अगोदर मिळाली असतांना संबधीत उपआयुक्त आज सभागृहात उपस्थित नाही. जाणीवपूर्वक अनुपस्थित असतात,सभेच्या दिवशी त्याची रजा मंजूर होवू नये. स.सभासद पोटतिडकीने प्रश्न मांडतात. अतिक्रमणाचा मूद्या उपस्थित केला त्या संबधी जे संबधीत विभाग प्रमुखच हजर नाही. उत्तर मिळणार नाही. कार्यवाही अपेक्षीत नाही तर सभा घेवून उपयोग नाही.जे अधिकारी गैरहजर आहेत त्यांनी आपली परवानगी घेतलेली आहे का याचा खूलासा होणे आवश्यक आहे. |
| मा. महापौर | : कोणत्याही उपआयूक्त यांनी माझी परवानगी घेतलेली नाही. मा. आयुक्त यांनी या संबधीत खूलासा करावा. |
| प्र.मा. आयुक्त | : उपआयुक्त प्रशासन श्री.कांबळे यांनी रितसर आठ दिवसाची सुट्टी घेतलेली आहे. उपआयुक्त महसूल श्री.आनंदकर यांनी २६ व २७ तारखेची किरकोळ रजा अगोदरच सादर केलेली होती. नंतर रद्य केली होती ते काल कार्यालयात हजर झाले होते. |
| श्री. काशिनाथ कोकाटे | : मा. महापौरांची परवानगी न घेता जर सभेच्या दिवशी अधिकाऱ्याची रजा मंजूर होत असेल तर योग्य नाही. यात मा.महापौर व सभागृहाचा अवमान आहे. असे असेल तर आम्ही प्रश्न मांडायचे की नाही हा प्रश्न आहे. मागिल बैठकीत जे विकास कामा संदर्भात निर्णय घेण्यात आलेले होते त्याची कोणतीही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. अतिक्रमणाबाबतचे उत्तरे द्यायला लावा, कोणती कामे केली याचा खूलासा घ्यावा. जाणून बुजून गैरहजर असतात. |
| श्री. बाबासाहेब डांगे | :संबधीत अधिकारी यांनी बेठकीला हजर राहणे आवश्यक होते.तसेच अतिक्रमणाच्या बाबतीत खूलासा करावा.प्रत्येकवेळा जाणूनबुजून गैरहजर राहतात. |
| श्री. नारायण कुचे | :सभा तहकूब करून सदर मुकूंदवाडी येथील अतिक्रमण काढण्यात यावे. त्यानंतर सभा घेण्यात यावी. |
| श्री. पुरूषोत्तम ठाकूर | : माझ्या वार्डात जे ओपनस्पेसवर अतिक्रमण झालेल आहे. त्या संबधीत मा. न्यायालयात प्रकरण चालू आहे काय विधी सल्लागार यांचा खूलासा घेण्यात यावा. |
| श्री.मुजीब खान | : अतिक्रमणाचा मुद्या सदस्यांनी अनेक वेळा मांडला.अशी प्रकरणे डायरेक्ट सहा. संचालक नगररचना यांचेकडे पाठविले जाते. सहा. संचालक नगररचना यांना वेळ नसतो. काही बांधकामाच्या बाबतीत डायरेक्ट जावून पाडण्यात येते. अशाच सिडको भागात एका ठिकाणी बांधकाम काढण्यात आले. जेव्हा नगरसेवक सांगतात तेंव्हा कार्यवाही केली जात नाही. कोणतेही प्रकरण सहा. संचालक नगररचना यांचेकडे पाठविले जाते.संबधीत विभाग मेजरमेंन्ट करीत नाही.सि.सर्वेचे रेकॉर्ड महापालिकेकडे असतांना मोजणी करून आणावी म्हणून सांगितले जाते असे असेल तर नगररचना विभाग कशासाठी आहे. दोन कामाच्या बाबतीत मी बोललो होतो अदयाप पर्यत सहा. संचालक नगररचना यांनी कार्यवाही केलेली नाही.आजपर्यत ज्या ज्या सदस्यांनी अतिक्रमाच्या संदर्भात बोलले त्या सबंधी कार्यवाही का झालेली नाही याचा खूलासा घेण्यात यावा.मा. आयुक्तांनी अनेक वेळा श्री.राठोड यांना बोलवून घेवून माहिती घेण्याचा प्रयत्न केला परंतू मी उदया बघून घेतो असेच उत्तर सहा. सचांलक नगररचना यांचेकडून मिळते हे बरोबर नाही. दीड वर्ष झाले अतिक्रमण काढले नाही. |

श्री.पुरूषोत्तम ठाकुर : सहाय्यक संचालक नगर रचना यांचा प्रश्न येत नाही. श्री.निकम प्रशासकीय अधिकारी यांचा संबंध येतो.

मा. महापौर : मागिल बैठकीत मुकूंदवाडी येथील अतिक्रमणाच्या संदर्भात आठ ते दहा दिवसात मार्कींग करून देणार होते ती झालेली आहे की नाही सहा.संचालक यांनी खूलासा करावा.

सहा. संचालक (न.र.) : कोणत्याही जागेची मार्कींग करण्यासाठी सहा. संचालक नगररचना हे प्राधिकृत नाही. या जागेची मार्कींग सिटी सर्वे किंवा ही जागा सिडकोच्या भागात असल्यामूळे सिडकोकडून डिमार्केशन करून घ्यावे लागणार आहे.

श्री. नारायण कुचे : अधिकारी चुकीची माहिती देत आहे. ती जागा गावठाणची आहे. मा. जिल्हा न्यायालयाने १००×५० ठेवावे उर्वरीत सर्व काढण्यात यावे.हाच निर्णय मा. उच्च न्यायालयाने कायम केलेला असतांना कार्यवाही झालेली नाही.

मा. महापौर : सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यानंतर डिपी रोडचे नकाशे महानगरपालिकेकडे आलेले नाही का ? आले नसतील तर कारण काय ?

सहा.संचालक न.र. : सिडको व सिटी सर्वे कार्यालयाचे डिमार्केशन घेणे आवश्यक आहे. अधिकृत मोजणी नकाशे आलेले नाहीत.

श्री. नारायण कुचे :सिडको व त्या व्यक्तीचा वाद नाही. श्री. जैस्वाल व महानगरपालिकेचा वाद चालू होता. तो रस्ता गावठान मध्ये येतो सिडकोचा काहीही संबध येत नाही.

सहा. संचालक (न.र.) : तो सिडकोचा रस्ता आहे. जागेची मालकी बाबत सिडको सिटी सर्वे कार्यालयाकडून डिमार्केशन करून घ्यावे लागेल.

श्री.मुजीब खान : सहा.संचालक नगर रचना यांना हे माहित नाही की, हा रस्ता महानगरपालिकेचा आहे की, सिडकोचा आहे. नगर रचना विभागाचे नकाशे आणून पहावे की, हा रस्ता कूठला आहे.

मा.महापौर : १३ तारखेच्या बैठकीत सदर ठिकाणचे मार्कींग करून दिले जाईल असे म्हटले होते. अदयाप का करण्यात आले नाही.

सहा. संचालक(न.र.) : १३ ऑक्टोंबरच्या नंतर खूप सूट्टया आल्यामूळे करता आले नाही. ही सत्य परीस्थिती आहे.

मा. महापौर : चार दिवसाच्याआत तेथील मार्कींग करून तसे प्रशासकीय अधिकारी यांचे कडे द्यावे व ताबडतोब अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी.

प्र.आयुक्त : रस्त्यावरील अतिक्रमण चार दिवसाच्या आत काढण्यात येईल.

श्री.बन्सीधर गांगवे : मा. महापौराच्या आदेशाचे पालन होत नाही. चार दिवसात अतिक्रमण न काढल्यास संबधीत अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करणार आहे.

मा.महापौर : चार दिवसाच्या आत अतिक्रमण काढले नाही तर संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल.

श्री.पुरूषोत्तम ठाकुर : माझ्या वार्डात खूली जागा आहे. १०'×१०' चे बांधकाम केलेले आहे. विधी सल्लागार यांनी खूलासा करावा. जागा कूणाची आहे. तोपर्यंत खाली बसणार नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : नमाजची वेळ झालेली आहे. एकतर सभा संपवावी किंवा दुपारी ३.०० वाजेनंतर घेण्यात यावी.

सौ.रजनी जोशी : सिडको हडको मुख्य रस्त्यावर अतिक्रमण होत आहे. त्याबाबत खूलासा व्हावा.

श्री.संतोष खेंडके : एक तासासाठी सभा तहकूब करावी.

मा. महापौर : एक तासाठी सभा तहकूब करण्यात येते. (सभा तहकूब १.२० वा. पून्हा दुपारी ३.१५ वाजता सभेला सुरूवात)

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : सभा तहकूब होण्यापूर्वी एक प्रश्न विचारला होता की, माझ्या वार्डात ओपन स्पेसमध्ये जी जागा आहे, कोर्ट केस चालू आहे. आता परिस्थिती काय आहे. कुणाच्या नांवावर आहे, कृपया त्याचा व्यवस्थित खूलासा करावा. ती जागा कूणाच्या नावावर आहे, कोर्ट केस काय चालू आहे. कोर्टात काय परिस्थिती आहे, त्याचा खूलासा करावा. माझ्या वार्डात श्री.यासीन खान यांचे कोर्टात वाद चालू आहे. विधी सल्लागार यांनी खूलासा करावा. संबंधीत व्यक्ती विरूध्द मी पोलीस स्टेशनला तक्रार सुध्दा दिली.

मा. महापौर : विधी सल्लागार यांनी खूलासा करावा.

विधी सल्लागार : जो मोकळया जागेसंबधी स. सदस्य यांनी प्रश्न उपस्थित केला तो नंदनवन कॉलनी येथील रेखांकनातील मोकळया जागेचा संबधी असून तेथे दोन मोकळया जागा आहे. एका जागेसंबधी मा. न्यायालयात वाद चालू आहे व एका जागेसंबधी क्षेत्रासंबधी वाद आहे. सर्वेनंबर २९,३० आहे. सहा. संचालक नंगररचना यांनी ले-आऊटनूसार ओपनस्पेस ठेवण्यात येते त्याची मोजणी करून खात्री करणे योग्य होईल. ज्या जागेचा मा. न्यायालयात वाद चालू आहे या संबधी स. सदस्य श्री. ठाकूर यांना दोन दिवसात लेखी कळविण्यात येईल.

श्री. पुरूषोत्तम ठाकूर : मा.न्यायालयात काय परीस्थिती आहे, याचा खूलासा अदयाप केला नाही. विधी सल्लागार यांना सर्व माहित आहे. २० वर्षापासून वाद चालू आहे गोलमोल उत्तर दिले, सहा.संचालक नगररचना यांचेवर ढकलण्यात येत आहे. कृपया आताच खूलासा देण्यात यावा. जनतेसमोर आम्हास जावे लागते.

श्री. प्रशांत देसरडा :कुणाच्या मालकीची जागा आहे.

मा. महापौर : स.सदस्य श्री.ठाकूर यांना दोन दिवसात न्यायालयातील परीस्थिती बाबत लेखी देण्यात यावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकुर : माझी विनंती आहे, मला लेखी नको इथेच उत्तर द्यावे.

श्री.सय्यद खुसरो : सदर जागा शासकीय , की खाजगी किंवा अतिक्रमण केलेली आहे याचा खूलासा करण्यात यावा.

मा.महापौर : लेखी खूलासा प्रशासनाकडून देण्यांत येईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : माझ्या वार्डात मुथीयान कॉर्नर येथे माधव घोरपडे महानगरपालिकेच्या मोकळया जागेवर अतिक्रमण केले तेथे महापालिकेचे संरक्षित भिंत होती. ती तोडून त्यांनी अतिक्रमण केले. अनेक वेळा मी निदर्शनास आणून दिले. संबधीत व्यक्तीनी रू.३.२५ लक्ष मोबदला घेतलेले आहे. मालमत्ता विभागाकडून माहिती मिळाली की संबधीत व्यक्लीला बांधकाम परवानगी दिलेली नसतांना इमारतीचे काम चालू होते. मागिल बैठकीत या विषयावर मी चर्चा केलेली होती. अतिक्रमण काढण्या संबधी प्रशासकीय अधिकारी हे तेथे जाऊन आले आहे. पूढच्या सभेत अहवाल देण्याचे मान्य केले होते. यांनी काय कार्यवाही केलेली आहे याचा खूलासा करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : लोकांच्या तक्रारी आहेत, प्रशासन मिळालेले आहे. झोपड्या तोडतात, बिल्डरची घरे राहते. उपआयुक्त महसूल उपस्थित नाही. खूलासा घेण्यात यावा.

मा.महापौर : उपआयुक्त श्री.आनंदकर यांची महापालिकेत आजची परीस्थिती काय आहे अतिक्रमण हटाव पथकाचे प्रमुख आहेत, ते कूठे आहेत, खूलासा करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : त्यांची बदली करावी. ते गरीबाच्या झोपड्या तोडत आहे. त्यांची बदली करण्याचा निर्णय आपण घ्यावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे : प्रशासकीय अधिकारी यांनी खूलासा करावा. त्यांना सर्व माहित आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: त्यांना तेथून काढून घ्या.बदनामी होत आहे.प्रत्येक बांधकामाच्या ठिकाणी जाऊन वसूली करीत आहे.आज जे सभागृहात उपस्थित नाही,त्यांना निलंबीत करावे.तर यापूढे आदेशाचे पालन करतील.१२० ठराव आपण घेतले त्यापैकी ५ ठरावावर अंमलबजावणी झाली.बाकी ठराव कचऱ्याच्या टोपलीत टाकले.या मनपास असे वाटू लागले,कौन्सीलचे नियंत्रण अधिकाऱ्यावर राहीले नाही.काही विशिष्ट पदाधिकाऱ्याचे वगळता इतर नगरसेवकांचे, नागरीकांचे एकही काम झाले नाही.

मा.महापौर : उपआयुक्त (म) सभागृहात नाही, ते का उपस्थित नाही, याचे कारण प्र.आयुक्त यांना माहित आहे का?

श्री.हिम्मतराव दाभाडे : श्री.निकम हे मागच्या बैठकीत प्रस्ताव सादर करणार होते. का केला नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : जे ठराव आपण पास केले, त्याची अंमलबजावणी किती ठरावाची झाली. पुंडलिकनगरच्या टाकीचे नुसते उद्‌घाटन केले, तेथे पाणी दिले जात नाही.

मा. महापौर : पुंडलिकनगर भागात पाणी देण्यासाठी दोन दिवस शटडाऊन करावे लागणार आहे. दिपावली रमजान ईद असल्यामूळे ते केले नाही आता ३१,१,२ तारखेला नोटीस देवून फारोळा येथे शटडाऊन करण्यात येईल. व पुंडलिकगनर भागात पाणी देण्यात येईल. या सभागृहाने ठराव घेतलेला आहे की ज्या ज्या ठिकाणचे गुंठेवारी रेग्यूलाईज होईल तेथे पाणी दिले जाईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : एक ठराव घ्या. किती ठराव मंजूर झाले व कितीची अंमलबजावणी झाले. जेथे हितसंबंधीत असतात ते होतात.

श्री.काशिनाथ कोकाटे : प्रस्ताव पारित होतात, त्याची अंमलबजावणी होत नाही. अतिक्रमणाचा विषय निघाला. उपआयुक्त महसूल हेच उपस्थित नाही त्या विभागावर नियंत्रण कूणाचे आहे, माहिती कोण देणार. सिडको व कैलासनगर भागात आजही पाणी नाही. पाणीपूरवठा अधिकारी तसेच उपआयुक्त महसूल हे दोन्ही ही अधिकारी उपस्थित नाही आपण त्यांना परवानगी दिलेली आहे का याचाही खूलासा करण्यात यावा.

श्री. हिम्मतराव दाभाडे : मुथियान कॉर्नर येथील अतिक्रमणा संबधी खूलासा घेण्यात यावा.

श्री.दिलीप गायकवाड :स.सदस्य श्री.हिम्मतराव दाभाडे वारंवार हा प्रश्न उपस्थित करतात परंतू कार्यवाही का केली जात नाही. जर अधिकारी अमलबजावणी करीत नसतील तर त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत : हा विषय मार्गी लावण्यात यावा.

प्रशासकीय अधिकारी :स.सदस्य श्री.हिम्मतराव दाभाडे यांनी जो मुद्या उपस्थित केला त्या संदर्भात श्री.माधवराव घोडपडे यांना महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे. जी संरक्षित भिंत होती ती संबधीत व्यक्तीने तोडलेली आहे.

श्री. हिम्मतराव दाभाडे : एक अधिकारी म्हणतात नाही. परवानगी दिली असेल तर त्याची प्रत सभागृहात दाखवावी.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : सदरील बांधकामास मा. उच्च न्यायालयाने सुध्दा स्थगिती दिली तरीही तेथे बांधकाम चालू आहे.

श्री. कचरू मोरे : प्रशासकीय अधिकारी हे सभागृहाची दिशाभूल करीत आहे. माधवराव व त्यांचा मुलगा माझ्याकडे आले होते. त्यांनी म्हटले की १९८३ ला त्या जागेचा आम्ही मोबदला घेतला , रस्त्यामध्ये जागा गेली आहे. संबधीत व्यक्तीच्या बाजूने मागिल बॉडीच्या वेळेस स्थायी समितीने ठराव पारीत केला आहे. सदर व्यक्तीने जागेचा मोबदला घेतला व एकीकडे प्रशासन त्यास मदत करीत आहे. उत्तर दक्षित रस्ता आहे. पूर्व बाजूने संबधीत व्यक्तीची इमारत आहे. दुसरी इमारत ही पश्चिम बाजूने

आहे. पुर्व बाजूची परवानगी पश्चिम बाजूने दाखविली जाते महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर संबधीत व्यक्तीला बांधकाम परवानगी दिली आहे का या बाबत माहितीच्या अधिकारात माहिती घेतली असता परवानगी दिलेली नाही. तरी सूध्दा सदर व्यक्तीने मोकळया जागेत अतिक्रमण केले व प्रशासकीय अधिकारी तसेच नगररचना विभागाचे अधिकारी श्री. घोरपडे यांना मदत करतात. श्री.हिम्मतराव दाभाडे यांनी अनेक वेळा स्थायी समितीमध्ये या संबधी प्रश्न उपस्थित केला आहे. परंतू त्याची दखल घेतली जात नाही. मा. न्यायालयाने सुध्दा स्थगिती दिलेली आहे ज्या जागेचा मोबदला संबधीत व्यक्तीने घेतला होता त्या संबधी माहिती घेण्यासाठी सहा. संचालक नगररचना विभागाशी संपर्क साधला असता दोन तीन ठिकाणी रजिस्टर बदलले असल्यामूळे नोंद केलेली सापडत नाही. ती नोंद अधिकारी शोधत नाही. या प्रकरणाची चौकशी करून जे महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण करून बांधकाम केले ते तोडण्यात यावे. मा.न्यायालयाने स्थगिती दिली, त्याबाबत कार्यवाही होत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :याप्रकरणात जे अधिकारी दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

मा.महापौर : प्रशासकीय अधिकारी यांनी या बाबतीत खूलासा करावा. सदर ठिकाणी महानगरपालिकेची भिंत तोडण्यात आली आहे व बांधकाम परवानगी दिलेली आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : अतिक्रमण काढण्यासाठी प्रशासकीय अधिकारी असतात, परंतू बांधकाम परवानगी चेक करीत फिरत आहे. कूणाकडून २०, ५० हजार अशी वसूली करीत आहे. त्यांना येथून हटवावे. मी ज्येष्ठ सदस्य जबाबदारीने बोलत आहे. याची बदली होणे अतिशय गरजेचे आहे. श्री.निकम यांना स्पॉटवर पाठविले जाते. बॉडीगार्ड आपला घेवून जातात. लोकांची घरे पाडतात. व तेथे बोलतात की, तुमचे सभासदत्व रद्द करील. यांचे पद रद्द करावे. तेंव्हा यांना कळेल की, कौन्सील मोठी की, आम्ही मोठे. कौन्सीलचा वचक ठेवण्यासाठी चार आठ अधिकाऱ्यांना जोपर्यंत घरी पाठवत नाही, तोपर्यंत तुमचे कोणीही ऐकणार नाही. कोणत्याही ठरावावर अंमलबजावणी होणार नाही. यांना चांगले समजून मदत करीत आहे, तर आपला अपमान जागोजागी करीत आहे. एक दूसऱ्या सदस्याचे नांव सांगतात, बदनामी करीत आहे. बदली करीत नसेल तर माझा राजीनामा देतो. या सभागृहात मी थांबत नाही.

श्री. हिम्मतराव दाभाडे : १९८३ पर्यत ती जागा महानगरपालिकेची ओपनस्पेस म्हणून होती. परंतू त्यानंतर ती जागा श्री. घोरपडे यांना देण्यास कोणत्या अधिकाऱ्यानी मदत केली त्याची चौकशी करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एवढे मोठे शहर होत असतांना माझ्या माहिती प्रमाणे १ एप्रिल २००५ ते मार्च २००६ अखेर पर्यत ५३२ घरांना बाधंकाम परवानगी दिली त्या नंतर पासून २० ऑक्टोबर २००६ पर्यत ३५० घरांना बाधंकाम परवानगी याचा अर्थ दीड वर्षात फक्त ९५० घरांना बांधकाम परवानगी दिली. परंतू शहरात ५० हजार नवीन घरे झालेली आहे यास जबाबदार कोण आहे. या बाबत माहिती घेण्यात यावी. सहा.संचालक नगर रचना यांनी मागील २ वर्षात किती बांधकाम परवानगी दिल्या, त्याचा खूलासा करावा.

श्री.हिम्मतराव दाभाडे :मुथियान कॉर्नर येथील महानगरपालिकेची जागा १९८३ पर्यत महानगरपालिकेची होती. श्री.गारे साहेब आयुक्त असतांना सदर जागेवर संरक्षित भिंत बांधण्यात आली. गेटही बसविण्यात आले होते. परंतू संरक्षित भिंत तोडून श्री.घोरपडे यांनी

अतिक्रमण केलेले आहे. यासंबधी श्री.निकम हे अहवाल देणार होते. का अहवाल दिला नाही, त्यांनी तेथे जाऊन काय घोळ केला.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: चौकशी होईपर्यंत यांना कूठल्याही कामावर घेवू नये, चौकशी करा नंतर घ्यावे. आपण रूलींग दिले, त्याची अंमलबजावणी केली नाही तर त्यांना दूसऱ्या विभागात पाठविण्याचा प्रस्ताव ठेवावा. आमचा सर्वांचा पाठींबा आहे. आपला राजकिय विरोध आहे, पण सभागृहाचा हा अपमान आहे. सहा टपऱ्यांना स्थगीती आदेश होते. ४ टपऱ्या गरीबांच्या होत्या, काढायच्या तर १० ही काढाव्या ४ टपऱ्या काढून बिल्डरकडून पैसे घेवून कंपाऊंडमध्ये जागा मिळून एका इमारतीला रस्ता दिला.

श्री.काशिनाथ कोकाटे : स.सदस्य तथा माजी महापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय हे अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. त्यात तथ्य आहे. अनेक वेळी अधिकारी हे नागरीकाच्या समक्ष नगरसेवकांच्या/पदाधिकारी यांच्या नावाचा गैरवापर करतात ते थांबले पाहिजे. स्थायी समिती सभेमध्ये चर्चा झाली होती, एका अतिक्रमणाच्या संदर्भात नगररचना विभागाने उपआयुक्त महसूल यांना लेखी अहवाल देवून व उपआयुक्त(म) व प्रशासकीय अधिकारी यांना आदेशित केल्यानंतरही कार्यवाही झाली नाही. बिल्डरने जाधववाडी भागात एक मोठी इमारत बांधली व त्या इमारतीला परवानगी संदर्भात उपअभियंता यांचे स्वाक्षरीचे खोटे प्रमाणप्रत्र दाखवले. खोटी सही बद्दल गुन्हा दाखल व्हायला पाहीजे,तो झाला नाही. जेष्ठ सदस्यांचे अधिकारी ऐकत नसतील त्यांचा सन्मान ठेवत नसतील तर अशा अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे.श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याचा पुर्णत: खूलासा होईपर्यंत दुसरा विषय चर्चेला घेण्यात येवू नये.

श्री. अ.साजेद अ.सत्तार: स. सदस्य व माजी महापौर श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी पोटतिडकिने प्रश्न मांडला त्याचा खूलासा घेण्यात यावा. भविष्यात लोक महानगरपालिकेच्या संरक्षित भिंत तोडून टपऱ्या टाकतील.

श्री.काशिनाथ कोकाटे : उपआयुक्त महसूल हे सभागृहात आले आहे, खूलासा घेण्यात यावा.

उपआयुक्त (म.) : श्री. घोरपडे यांना स्थायी समितीच्या मंजूरीने जागा देण्यात आलेली होती. तसेच बांधकाम परवानगी ही देण्यात आलेली आहे. सदर प्रकरणाची चौकशी करण्या संबधी स्थायी समितीने निर्देश दिले आहे त्याची चौकशी अंतिम टप्प्यात आहे. चौकशीच्या व्यतिरिक्त या प्रकरणाशी एक न्यायालयीन प्रकरण पण निगडीत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रशासकीय अधिकारी श्री.निकम यांना हटवा, त्यांना माहित आहे, मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश असतांनाही तेथे बांधकाम चालू आहे. या बाबतीत प्रशासन काय काम करीत आहे. एक वर्षापासून बांधकाम बंद होत ते आता चालू केले आहे.

विधी सल्लागार : या प्रकरणाशी जे रिट पीटीशन आहे ते १६९२५/२० या सीटीएस संबधीचे आहे. याप्रकरणात सीटीएस नंबर मध्ये फरक असल्याचे दिसून येते. या सीटीएस नंबरवर बांधकाम करण्यास मा.न्यायालयाने प्रतिबंध केले आहे.

मा.महापौर : श्री.घोरपडे यांचा सि.स.नं.१६९११/१-अ /१/१ आहे, कोणत्या सीटीएस नंबरला बांधकाम परवानगी दिलेली आहे ,खूलासा करण्यात यावा.

सहा.संचालक न.र. : सीटीएस क्रमांका बाबतची माहिती सद्या माझ्याकडे नाही माहिती मागवून घेतो.

श्री. काशिनाथ कोकाटे : सभागृहाचे आदेश अधिकारी ऐकत नसतील तर योग्य नाही पुन्हा पुन्हा तोच तो खूलासा ऐकावा लागतो.

श्री. सय्यद खूसरो : परवानगी दिली असेल तर प्रत दाखवावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : मागिल इमारतीचे मार्केट वाढण्यासाठी रस्ता करून दिला अधिकाऱ्याकडून उत्तरे मिळत नाही सर्व बिल्डरांना मिळालेले आहे.

श्री. कचरू मोरे : एकीकडे महानगरपालिकेने परवानगी दिली नाही म्हणून सांगतात व दिली असेही सांगतात दिली असेल तर सीटीएस नंबर चा खूलासा करण्यात यावा.

सौ. विजया रहाटकर : तुळशीराम गंगाराम या लेआऊटमध्ये आणखी एक मनपाची खूली जागा आहे. ती माझ्या वार्डाच्या दशमेशनगरच्या नाल्याला लागून जागा येते. यापूर्वी सदर जागेवर तीन चार वेळेस अतिक्रमण झालेले होते. ती जागा महानगरपालिकेच्या ताब्यातून जाण्याची शक्यता आहे. या जागेवर मोठया प्रमाणात घाण झालेली असून सदर जागेला संरक्षित भिंत करून घेण्याचे आदेशीत करावे व सदर जागा महानगरपालिकेच्या नावाने पी.आर कार्ड तयार करण्याचे आदेशीत करावे.

श्री.दिलीप गायकवाड : स.सदस्य श्री.साजेद यांच्या म्हणन्याप्रमाणे ५०,०००/- अनधिकृत बांधकामे झालेली आहेत, त्याला जबाबदार कोण.

उपआयुक्त (महसूल) : विधी सल्लागार यांनी सांगितलेला सीटीएस नंबर आणि स्थगिती आदेश असलेला सिटीएस नंबर एकच आहे किंवा काय या बाबत पाच मिनिटात संचिका मागवून माहिती देण्यात येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: मा. न्यायालयाचे स्थगिती आल्यानंतर दीड वर्षापासून काम बंद होते. परवाच्या दिवशी चार गरीब लोकांच्या टपऱ्या तोडल्या ६ टपरयावर मा. उच्च न्यायालयाचे स्थगिती आदेश होते ते सोडून दिले. तो रस्ता बिल्डरला दयायचा होता. म्हणून मोकळा केला असा माझा आरोप आहे. गरीब व्यक्तीच्या टपऱ्या काढून एक नामवंत बिल्डरला जागा करून देण्यासाठी अधिकाऱ्यांनी पाठींबा दिलेला आहे. त्या व्यक्तीकडून तुम्ही व्यक्तीने पैसे घेतलेले आहे. जेव्हा महापौर व माजीमहापौर तसेच मा. आयुक्त सांगतात की चौकशी करून टपऱ्या काढावे तेंव्हा अधिकारी तेथे ८.०० वा. जावून १० वाजेपर्यत रस्ता मोंकळा करून देतो यामागचे गुढ काय याचा खूलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मागिल दीड वर्षात किती घरांना बांधकाम परवानगी देण्यात आली.

मा.महापौर : संबधीतांना बांधकाम परवानगी किती देण्यात आली याचा लेखी खूलासा देण्यात यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : जाधववाडी येथील तसेच पडेगाव येथील अतिक्रमण का काढलेले नाही. पत्र दिलेले आहे.

मा. महापौर : या संबधी उपआयुक्त महसूल यांनी खूलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) : पडेगाव येथील संदर्भात सदर व्यक्तीने महापालिकेकडे बांधकाम परवानगी सादर केलेली होती. त्यानंतर सुधारीत बांधकाम परवानगी मनपाकडे सादर केलेली आहे. सुधारीत बांधकाम नूसार बांधकाम केले आहे असे संबधीत व्यक्तीचे म्हणणे आहे. सुधारीत बांधकाम परवानगी नुसार बांधकाम झाले नसेल बांधकाम परवानगी नामंजूर झाल्यास तोडण्यात येईल.

श्री. काशिनाथ कोकाटे :अधिकारी वेळकाढू पणा करतात. सहा. संचालक नगररचना यांनी सदर बांधकाम हे अतिक्रमण आहे ते तोडण्यात यावे असे पत्र अतिक्रमण विभागास गेलेले आहे. जर तसे आदेश आले नाही असे अधिकाऱ्याचे म्हणणे असेल तर अर्ध्या तासात त्याची प्रत दाखवतो दोन्ही अधिकारी यांना निलंबीत करण्याचे आदेश द्यावे. ज्या बैठकीत चर्चा झाली, त्याची माहिती अधिकाऱ्यांना आहे, त्यांनी संकेत पाळावे.

श्री.सय्यद खुसरो : अतिक्रमणाच्या प्रकरणात नगरसेवक मध्ये बोलल्यास नोटीस पाठविली जाते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : त्यांना हटविण्यात यावे. प्रकरणांची चौकशी करावी.

उपआयुक्त (महसूल) : श्री.माधव तुळशीराम घोरपडे यांना स्थायी समितीच्या मंजूरीने जागा देण्यात आलेली होती. त्या जागेवर बांधकाम परवानगी नगररचना विभागाकडून देण्यात आलेली होती. त्या जागेचा सिटी सर्वे नं.१६९११/१-अ /१/१ असा आहे. मा.न्यायालयात जो स्थगिती आहे तो सर्वे नंबर १६९२५ यावर आहे. न्यायालयीन प्रकरणांतील क्रमांक दोन्ही सिटी सर्वे नंबर वेगवेगळे आहे.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय: माधव घोरपडे यांची दुसरीकडे कूठेही जागा नाही. तर माधव घोरपडे यांना दुसऱ्या जागेचा स्टे येणार कसा. सदर जागे संबधी मा.न्यायालयात वाद चालू होता. स्थगिती आदेश दिलेले आहे. माधव तुळशीराम घोरपडे यांचे त्यात नाव आहे. तसेच नगररचना ॲक्ट नूसार ओपनस्पेसमध्ये बांधकाम परवानगी देता येत नाही. ओपनस्पेस मधील जागा माझ्या माहिती प्रमाणे १०% सोशल ॲक्टीव्हिटीज साठी देता येते.

श्री.मुजीब खान : एकाच लेआऊटमध्ये दोन सीटी सर्वे नंबर आहे का हे पहिल्यांदा बघावे लागेल. लेआऊटची एकच सिटी सर्वे क्रमांक आहे का. प्रशासन म्हणतात, ते दोन्ही क्रमांक वेगळे आहे. दोन्ही सीटी सर्वे नंबर जोडले जात नाही तो पर्यत लेआऊट होत नाही. या बाबत आपण ओरीजनल लेआऊची प्रत बघावी त्यांनतंर निर्णय घेण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :दुसरा जो सीटीएस नंबर आहे तो लेआऊट झाल्यानंतर टाकण्यात आलेला आहे. या संबधी चौकशी करावी. त्यानंतर निर्णय घेण्यात यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: श्री.माधव घोरपडे यांचे नावाची एकच परवानगी आहे. त्यांचेच नावाने मा.उच्च न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे.

श्री. मुजीब खान :जोलेआऊट झाला एक सर्वेनंबरमध्ये की दोनमध्ये याचा खूलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (महसूल) : सर्वे नंबर १६९२५/२० यामध्ये श्री.शरफोद्दीन विरूध्द महानगरपालिका प्रकरण दाखल केलेले आहे. श्री.माधव घोरपडे सि.सर्वे नं.१६९११/१ अ/१/१ असा आहे. हे दोन्ही सी.स. नंबर मॅच होत नाही.

श्री.मुजीब खान : सभागृहाची दिशाभूल होत आहे. याचा एक लेआऊट तयार झालेला आहे.तेंव्हा किती एकर किती गुंठेचा होता. कि यात दोन सी. सर्वे नंबर आहे हे क्लिअर करावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एवढेच नाही तर या जागेचा महानगरपालिकेने मोबदला ही दिलेला आहे.

श्री. मुजीब खान : डायरेक्ट सीटी सर्वे नंबर दुसरा दाखविला जात आहे.पैकी भाग दाखविला जात नाही. ही दिशाभूल केली जात आहे.

श्री. दिलीप गायकवाड : संबंधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.मुजीब खान : योग्य खूलासा करण्यास टाळाटाळ केली जात आहे. दोन्ही सिटी सर्वे वेगवेगळे आहे.११९२५ मधील भाग असता तर पैकी (बटे)असे दाखवले असते. एक लेआऊटमध्ये दोन नंबर नसतात.एकाच लेआऊटमध्ये दोन सर्वे कसे हे बरोबर आहे का ?

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: प्रशासकीय अधिकारी यांची बदली करावी व नंतर चौकशी करण्यात यावी तोपर्यत सदर बांधकामास प्रतिबंध करावे. श्री.सोनी किंवा उपआयुक्त यांचेकडे चौकशीसाठी द्यावे. दीड वर्षापासून बांधकाम बंद होते. आता चालू आहे. संबधीतास रस्ता मोकळा करून दिला. सभागृहाचे ऐकत नसतील तर शासनाकडे तक्रार करावी लागेल.

श्री. काशिनाथ कोकाटे : सहा. संचालक नगररचना यांनी पडेगाव येथील एका अतिक्रमणाच्या संदर्भात अहवाल दिलेला आहे असे असतांना सदरचे अतिक्रमण का काढण्यात आले नाही.

मा. महापौर : उपआयुक्त महसूल यांनी खूलासा करावा.

उपआयुक्त (म.) : पडेगाव सर्वे नं. ५ जयसिंगपूरा येथे गजानन भास्करराव टेहरे बांधकाम आहे. सदर व्यक्तीस नगररचना विभागा मार्फत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. नगररचना विभागाने दिनांक ९.३.२००६ रोजी या बांधकामात काही अनियमीतता असल्यामूळे तसे निदर्शनास आणून दिले. तशा आशयाचा पंचनामा दिनांक १६.३.०६ रोजी केला त्या अनुषंगाने एमआरटीपी ॲक्च्या कलम ५४ अन्वये नोटीस तामील करण्यात आली.

श्री. काशिनाथ कोकाटे : अनियमितता आहे, उपआयुक्त (म.) यांनी मान्य केले, सहा.संचालक न.र. यांनी बांधकामात अनियमीतता असल्याचा अहवाल देवूनही कार्यवाही केली नाही नोटीस देण्यात आली. नोटीसचा कालावधी संपलेला आहे किंवा काय संपला असेल तर पूढील कार्यवाही का केलेली नाही .

उपआयुक्त (म.) : एमआरटीपी ॲक्टच्या कलम ५४ अन्वये संबधीतास नोटीस देवून सदरचे बांधकाम हे तात्काळ काढून टाकण्यासंबधी आदेशीत केले आहे. नोटीसचा कालावधी किती दयायचा हे नोटीस देणाऱ्या अधिकाऱ्यावर अवलंबून असते. शक्यतो यामध्ये कमीत कमी कालावधी दिला जातो. पंरतू नोटीस दिल्यानंतरही सदर बांधकाम अद्याप काढलेले नाही. आठ दिवसाच्या आत सदरचे बांधकाम निष्काशित करण्यात येईल.

मा.महापौर : लेआऊट मधील बांधकाम परवानगी संबधी शहर अभियंता श्री. सोनी यांनी १५ दिवसात चौकशी करून अहवाल या सभागृहासमोर ठेवावा. तात्पुरती श्री. निकम यांची दुसऱ्या ठिकाणी बदली करण्यात यावी.

**विषय क्र. ५३९/१ :**

दिनांक २५/०९/२००६ रोजी (दि.२०/०९/२००६ ची तहकूब) व दि.१३.१०.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. मुजीब खान : ऐनवेळी प्रस्ताव प्रत्येक सभेत येतात, दिनांक २५.९.२००६ च्या बैठकीत काही ऐनवेळचे प्रस्ताव मंजूर केले होते. ते सर्व आज कायम करण्यासाठी आलेले आहे. विषय पत्रिकेवर यावयास पाहीजे होते, ते ऐनवेळी मंजूर केले. यातील ठराव क्र.४५१ भुखंडचा फेरबदलाचा प्रस्ताव आहे. बैठकीत वाचून दाखवलेले नाही. या ठरावात क्षेत्रफळ नाही. सीटी सर्वे टाकण्यात आले. कुणाची मालकी आहे नाव नाही. किती जागा आहे. असा कोणताही उल्लेख यात नाही. त्यास मंजूर करून आज इतिवृत्त कायम करण्यासाठी ठेवले हे योग्य नाही. भुखंडाचे जे ही प्रस्ताव येतात ते तीन दिवस अगोदर स. सदस्याना मिळावयास पाहिजे. हा आरक्षणाचा मुद्या आहे हा प्रस्ताव रद्य करावा. भुखंड व आरक्षण वगळण्याचे प्रस्ताव तीन दिवस सदस्यांना अगोदर मिळणे आवश्यक आहे.

श्री.सिताराम सुरे : २५.९.२००६ रोजी सहा ठराव ऐनवेळी आलेले होते. ते प्रशासकीय ठरावशहर सूधार समिती मार्फत यायला पाहिजे होते.

श्री. दिलीप गायकवाड : ऐनवेळी भूखंडाचे जे ही प्रस्ताव आले ते रद्य करण्यात यावे.

श्री.किशोर तुलशीबागवाले : ठराव ठेवण्याचा स. सदस्यांना अधिकार आहे. या ठरावास मंजूरी देवून यावर मा. आयुक्तांनी निर्णय घ्यावा असे रूलीग दिले आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: जे भुखंडाचे प्रस्ताव ठेवले ते अशासकीय प्रस्ताव आहे. नागपूर मनपामध्ये ५२ लोकांना शिक्षा झाली जळगाव मनपामधये ७२ लोकांना तर कल्याण महापालिकेत ४८ लोकांना शिक्षा झाली होती. त्याप्रमाणे या सभागृहातील लोकांना होवू नये. या

| | |
|---|---|
| | ठरावाविरूध्द मा.न्यायालयात कुणी प्रकरण दाखल केले तर सभागृह दोषी ठरू शकते. सदर प्रस्ताव प्रशासनामार्फत यावे. |
| श्री. कवरसिंग बैनाडे | : या प्रस्तावावर विधी सल्लागार यांचा सल्ला घेवूनच कार्यवाही करावी. |
| मा. महापौर | : विषय क्र १ हा स्वीकृतीसह मंजूर केलेला आहे. यात काय दुरूस्ती असेल ती करावी. शासकीय अशासकीय जे ठराव होते ते सर्व घेतलेले आहे. ९० दिवसानंतर पून्हा ठराव बदलण्याचा अधिकार आहे. स.सदस्यांनी माझ्याकडे विनंती केली होती त्या सर्व प्रस्तावास त्यावेळी मंजूरी दिलेली आहे. |
| श्री. मुजीब खान | : भूखंडाचे जेही प्रस्ताव असतात आरक्षण बदलावयाचे असेल किंवा इतर असतील ते तीन दिवस स.सदस्यांना नियमानूसार देणे आवश्यक आहे परंतू तसे झाले नाही. |
| मा. महापौर | : सभागृहाने निर्णय घेतलेला आहे. मा.आयुक्तांना त्या संबधी अधिकार दिलेले आहे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | : स.सदस्य श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी नागपूर कल्याण तसेच जळगाव महापालिकेचा उल्लेख केला आहे. इतर महानगरपालिकेत ज्या लोकांना शिक्षा झाली तो विषय घरकूल वाटप योजनेचा होता. स्वेच्छा निधीचा गैरवापर झालेला होता. काही साहित्य आलेले नव्हते. ते विषय वेगळे होते. हा विषय वेगळा आहे. कुठलाही गैरवापर या सभागृहात झालेला नाही. हे सदस्यांनी समजून घ्यावे. |
| श्री. संजय जगताप | : विरोध दर्शवून वृत्तांत कायम करावे. |
| श्री. मुजीब खान | : विरोध नोंद करण्याची बाब वेगळी आहे. नियमानूसार आले नाही, यावर आमचा विरोध कोणत्याही ठरावास नाही. भुखंडाच्या आरक्षणाच्या प्रस्तावा बाबतीत ४ दिवसापासून वृत्तपत्रात येत आहे, त्यावर निर्णय घ्यावा. |
| श्री.वसंत नरवडे | : या भूखंडाच्या प्रकरणामध्ये औरंगाबाद शहरातील सर्व वृत्तपत्र यावर चर्चा करीत आहे. यात आघाडीचा उल्लेख आजच्या काही वृत्तपत्रात आलेला आहे की, या सभागृहात आघाडीचे नगर सेवक गुंतलेले आहे. यात कूठले नगर सेवक आपल्या बाजूने आले व कोणत्या ठरावास मंजुरी व विरोध केला ते दाखवावे. नंतरच आमचे त्यांचेशी संबंध जोडले जावे.याप्रस्तावाबाबत आम्ही विरोध केला तो राहील. |
| श्री.भागवत कराड | : दिनांक १३.१०.२००६ च्या बैठकीत जे दिनांक २५.९.२००६ च्या बैठकीत ऐनवेळचे जे आरक्षण बदलीचे प्रस्ताव मंजूर केले त्यास भारतीय जनता पार्टीच्या सदस्यांनी विरोध केला होता. विनंती की विषय क्र.४४१,४४२,४४३,४५१, ४५४, ४८५,४८७ हे ऐनवेळी प्रस्ताव आलेले होते त्यावर कोणत्याही सदस्यांना अभ्यास करता आला नाही. आताच सभागृहात इतिवृत्त कायम करण्यास आलेले आहे. त्यास आमचा विरोध आहे. |
| श्री.प्रशांत देसरडा | : आताच विषय क्र १ वर बऱ्याच सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले आहे.ठराव कोणत्या स्वरूपाचे आहे यापेक्षा ते ऐनवेळी घेण्यात आले. ऐनवेळचेही अनेक वेळा प्रस्ताव मंजूर केले आहे मग ते प्रशासकीय असतील नगरसेवकांनी ठेवलेले असतील. विकास कामाचे असतील. कमीत कमी ते विषय आमच्या समोर येतात व ते आम्ही वाचन करतो. तशा ऐनवेळच्या विषयास मंजूरी देण्यास विरोध नाही. परंतू मागच्या बैठकीत ७ ठराव आणि त्यात आठ विषय असे जे काही आलेले आहे ते विषय आम्हा सदस्यांना वाचावयास मिळाले नाही किंवा विषयपत्रिकेवर आले नाही. जे स.सदस्य त्या विषयाचें सूचक व अनुमोदक होते त्यांना असे विषय तातडीने ठेवण्याची काय गरज होती. निवडूण येवून दीडच वर्ष झाले. विषय क्र ४४१,४४२,४४३,४५१,४५४,४८५,४८७ या ठरावास माझा विरोध आहे. सभागृह नेता यांचे मी अभिनंदन करू इच्छितो की, त्यांनी या सभेत अतिशय |

चांगला ठराव मांडला, गजानन महाराज मंदीर रस्त्याला लागून मेन रोडवर पूढे असणारी मोक्याची जागा भुसंपादीत करून उपकेंद्र व विविध सुविधा देण्याचा ५२५ क्रमांकाचा ठराव आलेला आहे. आरक्षण क्र.२२९ हे लवकरात लवकर जागा भुसंपादनासाठी मा.जिल्हाधिकारी यांचे कडे पाठवून पूढील कार्यवाही करावी.

श्री. संतोष खेंडके : या अनुषंगाने मी विषय क्र.५२५ मध्ये दुरूस्ती सूचना सूचवू इच्छितो की, हा जो ठराव मी मांडलेला आहे त्यात महानगरपालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान न होता किंवा महानगरपालिकेस कोणतीही आर्थिक झळ न लागता या ठरावावर विचार व्हावा.आणि यामध्ये मी दुरूस्ती सूचना अशी सूचवितो की भूसंपादन किंवा समूचित आरक्षणांच्या माध्यमातून विकास व्हावा.यानंतरचे सर्व विषय मंजूर करावे.

मा. महापौर : श्री.संतोष खेंडके व श्री. मुजीब खान यांनी सूचविल्याप्रमाणे दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यात येते.

श्री. कैलास गायकवाड : दिनांक २५.९.२००६ च्या बैठकीत जे ७ भूखंडा बाबतचे प्रस्ताव मंजूर केले ते रद्य करण्यात यावे.

श्री. मुजीब खान : काय निर्णय घेतला कळायला मार्ग नाही. दुरूस्ती काय करणार आहे याचा खूलासा करावा.

मा. महापौर : स.सदस्यांचे ठराव त्यावेळी आले होते त्यास कार्योत्तर मंजूरी दिलेली होती.

श्री.मुजीब खान : ठराव नियमावलीप्रमाणे सादर करावेत. या ठरावात क्षेत्रफळ नाही. मालकी कुणाची आहे ते नमूद केले नाही.

मा. महापौर : विषयक्र.४५१श्री.मुजीब खान,श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय,श्री.संतोष खेंडके यांनी सूचविलेल्या दुरूस्तीसह कायम करण्यात येते.इतिवृत्तात ते ठराव आलेले आहे. ते आता कायम करून यानंतर आपणांस ९० दिवसानी परत निर्णय घेता येतो.

श्री.मुजीब खान : स.सदस्य जे बोलत आहे ठराव क्र.४५१ रद्य किंवा स्थगित करावा.

श्री. वंसत नरवडे : ठरावाचे इतिवृत्त मुंबई पर्यत पोहचले असून सदर बैठकीत ऐनवेळचे जे ठराव होते ते सदस्यांना विश्वासात घेवून यावयास पाहिजे होते. या ठरावावर मतदान घेण्यात यावे.दुरूस्ती करण्याचे सदस्यांनी सूचविलेले नाही. रद्य करण्याचे म्हटले आहे रद्य करण्यात यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: जे ऐनवेळी ठराव घेण्यात आले ते ठराव स.सदस्यांना अभ्यास करण्यासाठी देण्यात आलेले नव्हते. नियमावलीमध्ये क्लिअेर आहे की जर चार सदस्यांनी मागणी केल्यानंतर मतदान घेता येतो.इतिवृत्त कायम करतांनाही मतदान घेता येते. आपसात वाद करू इच्छित नाही. परंतू हे कुठेना कूठेतरी रोखले पाहिजे.

मा. महापौर : स.सभागृह नेता तसेच स. सदस्य श्री.मुजीब खान यांनी जी दुरुस्ती सुचविलेली आहे ती दुरूस्ती करून व ज्यांचा विरोध आहे तो नोंदवून विषय क्र १ इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

श्री. प्रशांत देसरडा : दुरूस्ती काय केली खूलासा व्हावा.

मा. महापौर : या प्रस्तावामध्ये नियमानूसार काय दुरूस्ती करता येईल ती होईल. व प्रशासनाकडे पाठविले जाईल.

श्री. संजय जोशी : इतिवृत्तामध्ये ठराव क्र. ५१२ मध्ये असे दिले की सिध्दार्थ उद्यान विकासकाला देत आहोत त्याच विकासकास उद्यानातील टेरेस आहे ते प्रति वर्ष ६० रूपये प्रति चौ.मीटर या भाडेने देणे बाबत दिले आहे. मूळ निविदेत भाडे तत्वाचा दर वगैरे जे दिले ते या सभागृहासमोर काहीच आलेले नव्हते. प्रशासनाचा हा ठराव ठेवलेला असून तो मंजूर करून घेण्याचा प्रयत्न चालू आहे. भाडे कसे ठरविले याचा खूलासा करावा.

श्री. प्रशांत देसरडा : हा विषय वाचल्यानंतर धक्कादायक वाटते. बीओटी पध्दत म्हणजे काय यावरच चर्चा करावयास पाहिजे. परंतू वेळ कमी आहे. सिध्दार्थ उद्यानमधील जागा बीओटी पध्दतीने विकास करण्यासाठी दिली. बीओटीचे टेंडर काढले त्यावेळेस विकास करण्याच्या दृष्टीने अटी व शर्ती ठेवल्या होत्या त्या टेंडरमध्ये कूठे ही असे नमूद नव्हते की वरील छताची जागा संबधीत बीओटभवर जो कुणी घेईल त्यांना देण्यात येईल.संबधीत ठेकेदारास त्यास रेट नुसार देण्यात येत आहे. आपल्याकडे भाडे समिती असते.स्थायी समितीच्या मार्फत हा विषय सर्वसाधारण सभेच्या मंजूरीसाठी येणे आवश्यक होते. बीओटीवर ज्यांना दिले त्यांना छत देण्याची घाई का झाली.

मा. महापौर : संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

उपअभियंता (बीओटी) : सिध्दार्थ गार्डन जे बीओटीवर विकास करण्यासाठी दिले आहे. त्यामध्ये प्रोजेक्ट डिटेलस् मध्ये सर्व जे छत आहे.ते महानगरपालिकेचेच राहणार आहे.अशी अट टाकलेली होती. ज्या लीज रेटप्रमाणे बीओटी देण्यात आले त्या प्रमाणे प्रति चौ. मीटर ६०/-रूपये प्रति वर्ष या प्रमाणे छत देत आहे. जेंव्हा तो विकसक ज्या जागेचा आपल्याला प्रिमीयम भरणा करीत आहे. त्यामध्ये सर्व छत वगैरे बिलटप् भाग समावेश असतो . या टेंडरमध्ये अट असल्यामूळे एक धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सर्वसाधारण सभेकडे हा प्रस्ताव आलेला आहे. त्या छताचा वापर तो विकासक करणार त्यासाठी त्यांना वरील प्रमाणे रक्कम दयावी लागेल.

श्री. प्रशांत देसरडा : याचा अर्थ टेंडर रिकॉल करावे लागेल. टेंडर काढतांना चूक झाली.

श्री. संजय जोशी : टेंडर प्रशासनाने काढायचे पाहिजे त्या प्रमाणे अटी शर्ती टाकायच्या व नंतर धोरणात्मक बाब या नावाखाली सर्वसाधारण सभेकडे मंजूरीसाठी ठेवायचे हे बरोबर नाही. टेंडर काढले तेंव्हा या सभागृहासमोर का ठेवले नाही.त्या जागेवर वापर काय करणार आहे. भविष्यात त्याने मंगल कार्यालय सुरू केले तर काय करणार आहे.

मा. महापौर : छताच्या खाली जो कुणी दुकानदार राहिल ती जागा विकासकास दिली आहे. छताचा वापर महानगरपालिकेला करता येणार नाही म्हणून ते छत भाडेने देत आहे. यात महानगरपालिकेचा फायदा आहे.

श्री. मुजीब खान : खालची जागा दिली टेरेस देण्याची गरज काय? छताचा वापर कशासाठी करणार आहे या बाबत प्रशासनाची भुमिका काय खूलासा करावा. भविष्यात तेथे बिअर बारचे दुकान ही होईल. हे बरोबर नाही.

श्री. वसंत नरवडे : टेंडर प्रमाणे बीओटीवर देण्यात यावे छताची मालकी महानगरपालिकेकडेच ठेवावी असा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.प्रशांत देसरडा : एकूण टेंडर किती आले होते.

उपअभियंता (बीओटी) : तीन टेंडर आलेले होते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : प्रस्ताव आपण रद्य करू शकतो. जे दयाचे ते देवू शकतो. काही सदस्य म्हणतात ते बेअर बार दुकान टाकू शकतो. बीओटीवर खालची जागा दिली ती कमी दराने दिली ती ही रद्य करू शकतो.

श्री.मुजीब खान : खालची जागा विकसीत करण्यासाठी दिली छत भाडेने देण्याची गरज काय याचा खूलासा करावा.

उपअभियंता (बीओटी) : यात महानगरपालिकेचा फायदा आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: ४५० क्वेअर फुटचे जाहिरातवाले १.५० लक्ष रूपये देईल. यात महानगरपालिकेला काय फायदा होणार आहे. महापालिकेने जाहिरात लावल्यास लाखो रूपये मिळतील.

उपअभियंता (बीओटी) : तेथील जागा ही संबधीत विकासक यांना ६० रू. प्रति चौ. मीटर प्रमाणे देण्यात आलेली आहे. छत महानगरपालिकेकडे राहणार आहे. छत भाडेने दिले तर आणखी रक्कम महापालिकेस मिळणार आहे.

श्री.संजय जोशी : ६० रूपये प्र. चौ. मी. या प्रमाणे महापालिकेला किती उत्पन्न होणार आहे.

उपअभियंता (बीओटी) : कमीत कमी ५ लक्ष रूपये मिळणार आहे.

श्री. सय्यद खुसरो : चांगले उद्यान आहे. बीओटीवर का देण्यात येत आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: ५ जाहिरात लावल्यास पाच लक्ष रूपये मिळतील.

श्री.वंसत नरवडे : टेंडर मध्ये छताचा उल्लेख नाही. छत देण्यात येवू नये, महापालिकेकडे मालकी हक्क ठेवावा.

श्री.सय्यद खुसरो : बीओटीवर देवू नये रद्य करावे. तेथे महानगरपालिकेची मालकी राहणार नाही संबंधीत विकासक काहीही करील.

मा. महापौर : दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक २५/०९/२००६ रोजी (दि.२०/०९/२००६ ची तहकूब) व दि.१३.१०.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दुरूस्तीसह कायम करणेस मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. ५४०/२ :**

दि.१३.१०.२००६ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.४९१/३ नुसार.

आयुक्त,महानगरपालिका,यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,महानगरपालिका प्रशासकीय इमारत टप्पा क्र.१,२,३ येथे मा.पदाधिकारी व अधिकारी यांच्या दालनात व मनपा प्रशासकीय इमारत परिसरात आवश्यक कामे करणेस्तव मा.पदाधिकारी व अधिकारी यांची अग्रहाची मागणी असल्या कारणाने सदरील कामे करणेस्तव सन २००६-०७ या आर्थिक वर्षा अंतर्गत रक्कम रू.१५.०० लक्षची तरतूद होती तथापी सदरील तरतुद संपुष्टात आली असल्यामूळे मा.पदाधिकारी व अधिकारी यांच्या मागणीनुसार आवश्यक कामे करणे शक्य होत नाही व त्यामूळे संबंधीतांची होणारी गैरसोय लक्षात घेता सदरील कामासाठी १५.०० लक्षची तरतूद आवश्यक आहे.

करीता मनपा अर्थसंकल्प सन२००६-०७ पुस्तीका मधील पा.क्र.एम-४९ अ.क्र.१ (ब-२ अग्निशमन विभाग) अन्वये ठेवण्यात आलेली २.०० कोटी रूपयाची तरतूद या आर्थिक वर्षात पूर्णपणे खर्च होणार नसल्याने या तरतूदीमधून रक्कम रू.१५.०० लक्षची तरतुद सदरील कामास्तव वळती करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. काशिनाथ कोकाटे : या प्रस्तावात १५ लक्ष रूपयाची आवश्यकता आहे असे दिले. अग्निशामक विभागासाठी बजेटमध्ये दोन कोटीची तरतूद ठेवण्यात आली होती. त्यातून १५ लक्ष रूपये वळती करून देण्याचा हा प्रस्ताव आहे. या रक्कमेसाठी अग्निशामक विभागाचे प्रमुख जे आहे त्याची सम्मती घेतलेली आहे का?

श्री.प्रशांत देसरडा : या विषयाच्या अनुषंगाने सिडको येथील सिव्हर ट्रीटमेंट प्लँटच्या बजेट मधून रक्कम वळती करण्याचा प्रस्ताव आहे. याबाबतीत सूध्दा खुलासा करण्यात यावा.

सौ. लता दलाल : यात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती अशी कोणती कामे आहे की अग्निशामन विभागाची रक्कम वळती करण्याची गरज पडते.

कार्य.अभियंता(विद्यु) : अग्निशामक विभागाचा प्रमुख म्हणून माझ्याकडे पदभार आहे. माझ्या दृष्टीने दोन कोटी रूपये मार्च पर्यत खर्च होणार नाही. हे काम नियमीत करणे आवश्यक आहे त्यामूळे वळती करण्याचा प्रस्ताव आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : अग्निशमन विभाग हा कुणाच्या नियत्रणांखाली चालतो.

कार्य.अभियंता(विद्यु.) : अग्निशामन विभागाचा नुकताच कार्यभार माझ्याकडे देण्यात आलेला आहे. त्यामूळे मी त्यावर मत व्यक्त करून हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :अग्निशामक प्रमुख कोण आहे यांची माहिती आपणाकडे आलेली आहे काय? प्रशासनाच्या सोयीनूसार वाटेल तेंव्हा आदेश काढले जातात का? पदाधिकाऱ्याना विश्वासान न घेतास अधिकाऱ्याच्या बदल्या करण्यात येतात. तो विभाग कुणाच्या अंतर्गत होता. कुणाच्या आदेशाने बदली करण्यात आलेली आहे. माझ्या माहिती प्रमाणे महसूल विभागाच्या अंतर्गत हा विभाग होता. त्यानंतर अधिक्षक अभियंता यांचेकडे होता. कार्यअभियंता विद्युत यांचेकडे केंव्हा हा विभाग दिला हे आम्हा कुणासही माहित नाही.आठ दिवसाला विभाग प्रमुखाच्या बदल्या केल्या जात असतील, तर त्याची माहिती पदाधिकारी यांना देणे आवश्यक वाटले नाही का ?

कार्य.अभियंता(विद्यु.) : कृपया प्रस्तावास मंजूरी दयावी.प्रशासकीय इमारतीची दुरूस्ती करण्यासाठी खर्च लागणार आहे. मागच्या बैठकीच्या वेळी हेच सभागृहात पावसाचे पाणी येत होते. आपण म्हटले होते की दुरूस्त करावे.

सौ. लता दलाल : हा प्रस्ताव स्थगित करण्यात यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : वार्ड अभियंता कूणाच्या अंतर्गत काम करतात व कूणाच्या आदेशाची अमलबजावणी करतात. या प्रस्तावास मंजूरी दयावी परंतू प्रशासनाचा कारभार कशा पध्दतीने चालतो याची पदाधिकाऱ्याना माहिती तरी दिली पाहिजे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: कोणते कर्मचारी अधिकारी कुणाच्या नियंत्रणाखाली काम करतात त्याची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी.

शहर अभियंता : एकूण ६ प्रभाग कार्यालय केलेले आहे. त्यासाठी ६ वार्ड अभियंता दिलेले आहे. वार्ड अभियंता यांना ५ लक्ष पर्यत चे काम करण्यास परवानगी दिलेली आहे. वार्ड अभियंता हे रस्त्याचे , ड्रेनेज तसेच इमारतीची दुरूस्तीची व इतर काही काही देखभाल दुरूस्तीची कामे करतात, तसेच सर्व कामे ही कार्यकारी अभियंता यांचेकडून माझ्या विभागाकडे येतात. सर्व वार्ड अभियंता हे माझ्या अधिपत्त्याखाली काम करतात.

श्री. काशिनाथ कोकाटे : सिडको महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले असून सिडको भागात विकास कामे करण्या संदर्भात तसेच ज्या एकूण ४४ सोसायटीज येतात. त्या सोसायटीजला सोयी सूविधा देण्याच्या संदर्भात तेथील कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आपण संबधीत अधिकारी यांना आदेशीत केलेले होते.आजपर्यत शहर अभियंता यांचेकडून संबधीत कार्यकारी अभियंता तसेच वार्ड अभियंता यांना विकास कामे करण्या संदर्भात कोणतेही पत्र दिले नाही उलट सिडको भागातील गृह निर्माण संस्था असलेल्या भागात कोणतेही काम करायचे नाही असे पत्र संबधीत कार्यकारी अभियंता व वार्ड अभियंता प्रत देवून कळविले. त्यामूळे कोणतेही काम या भागात केले जात नाही हे खेदाने सांगावे लागते. सिडको भागात जर विकास कामे होत नसतील तर या सभागृहात आम्हाला राहण्याचा हक्क नाही असे वाटते. सिडको भागातील कामे होत नसतील तर तेथील नागरीकांचा प्रश्न सोडवायचा कोणी असा प्रश्न निर्माण होतो.

शहर अभियंता : सिडको भागात ४२ गृह निर्माण संस्था येतात. सिडकोकडे या गृह निर्माण संस्था मधील विकास कामे केली जात नव्हती गृह निर्माण संस्था मधील लोकांनीच विकास करायचा व सिडकोत हस्तांतर करून दयायचे असे होते. सिडकोचा जो स्टॅण्ड होता तोच महानगरपालिकेने कायम ठेवला.एक महिण्यापूर्वी मा.आयुक्त

असतांना एक बैठक घेण्यात आलेली होती. त्यावेळी कोणत्या गृह निर्माण संस्थेमध्ये रस्ते , लाईट, ड्रेनेज, नाही या बाबतीत त्यांनी आम्हाला मार्गदर्शन दिले त्या बैठकीचे इतिवृत्त तयार करून त्यावर सहया करून मा.आयुक्ताकडे आहे. या भागात काम करण्यास तसे आदेशीत केले नाही परंतू सर्व कार्य. अभियंता यांनाी तोंडी सांगितलेले आहे. या भागातील रस्त्याचा सर्वेचे काम पूर्ण झालेले असून आता पूर्ण सर्वे करून त्या विकास कामासाठी किती रक्कम लागेल तसा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे : ९ महिण्याच्या कालावधीनंतर त्या गृह निर्माण संस्थामध्ये पाहणी करणार गेल्या आठ वर्षापासून अधिक्षक अभियंता यांचे नियंत्रणांखाली संपूर्ण टेक्नीकल विभागाचे कामकाज चालते. ८ वर्षापासून अधिक्षक अभियंता पाहणी करीत आहे त्यांचे संपूर्ण रेकॉर्ड माझ्याकडे आहे. असे असतांना पून्हा पाहणी करायची अहवाल दयायचा असे उत्तर मिळते हे बरोबर नाही.

मा. महापौर : देखभाल दुरूस्तीची कामे कोण करणार.

शहर अभियंता : त्या गृह निर्माण संस्थामध्ये काम करावे किंवा नाही. कारण तेथील नागरीक त्या संस्थामध्ये स्वत: विकास करणार होते. त्या बाबतीत निर्णय झाला नव्हता. मा. आयुक्तांनी एक महिण्यापूर्वी निर्णय घेवून तेथील विकास कामाचे अंदाजपत्रक सादर करणार आहोत. त्यासाठी एक महिणा लागेल.

श्री.काशिनाथ कोकाटे : तोपर्यत या भागात देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात यावी.

मा.महापौर : सिडको भागातील गृह निर्माण संस्थामध्ये विकास कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी एक महिणा लागणार आहे तोपर्यत तेथे देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात यावी.

श्री.भाऊसाहेब ताठे :सिडको भागात विकासकामाचे जे अंदाजपत्रक तयार केलेले आहे ती कामे सूरू करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : सिडको भागात काम करण्यास ९ महिण्यापासून वेठीस धरलेले आहे. राज्यमंत्री यांनी या भागात कामे करण्याचे आदेशीत केलेले आहे. तरीही कामे होत नाहही. यानंतर कामे झाले नाही तर अधिकाऱ्याच्या कॅबीनमध्ये तोडफोड झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची राहिल याची नोंद घ्यावी.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिका प्रशासकीय इमारत टप्पा क्र.१,२,३ येथे मा.पदाधिकारी व अधिकारी यांच्या दालनात व महापालिका प्रशासकीय इमारत परिसरात आवश्यक कामे करणेच्या र.रू.१५.०० लक्षची तरतूद मनपा अर्थसंकल्प सन २००६-०७ पुस्तीका मधील पा.क्र.एम-४९ अ.क्र.१ (ब-२ अग्निशमन विभाग) अन्वये ठेवण्यात आलेली र.रू.२.०० कोटीच्या तरतूदीतून वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४१/३ :**

दि.२५.०९.२००६ रोजीच्या(दि.२०.०९.०६ची तहकूब)सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.४२९/४ नुसार

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक ११.०८.२००६ ठराव क्र.२८४/४ अन्वये मिटमिटा येथील गट नं.९६,९७,१०१,१०२ व १०३ मधून २४ मी. रूंद विकास योजना रस्त्याचे भूसंपादनाचा प्रस्ताव मंजूर केलेला आहे. हा २४ मिटर रूंद मंजुर विकास योजना रस्ता पूढे उत्तरेला गट नं.८९,९०,९१ मिटमिटा मधून विद्यमान कत्तलखाना पडेगांव पर्यंत जातो या २४ मिटर रूंद रस्त्यासाठी गट नं.८९,९०,९१ मधील या रस्त्याने बाधित होणारी संपूर्ण जागा संपादन केल्यास विद्यमान मुंबई रोडवरून पडेगांव कत्तलखान्यापर्यंत २४ मिटर रूंद रस्ता तयार होईल. सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पामध्ये पान क्र.डब्ल्यु १५० अ.क्र.४ वर वार्ड क्र.८ मध्ये ९ लक्ष रूपयाची तरतूद केली आहे आणि अ.क्र.७ मध्ये

रस्त्यासाठी ८ लाखाची तरतूद केलेली आहे. हा खर्च या भूसंपादनावर करण्यास आणि गट नं.९६,८९, ९०,९१ मधून पडेगांव कत्तलखाना पर्यंतच्या २४ मिटर रूंद रस्त्याचे भूसंपादन करणे व भूसंपादनासाठी प्रस्तावित अर्थसंकल्पीय तरतूदीतून संभाव्य रक्कमेस मान्यता देण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.तरविंदरसिंग धिल्लन अनुमोदक :१.श्री.अ.साजेद अ.सत्तार, २.श्री.कैलास गायकवाड, ३.श्री.स.खुसरो स.बुऱ्हानोद्दीन,४.श्री.हिम्मतराव दाभाडे

मा. महापौर : विषय क्र.३ व ४ मंजूर. तसेच प्रशासकीय, अशासकीय व स.सदस्यांचे सर्व ऐनवेळचे विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिटमिटा येथील गट नं.८९,९०,९१ व ९६मधून विद्यमान कत्तलखाना पडेगांव पर्यंत जाणारा २४ मिटर रूंद विकास योजना रस्त्याने बाधित होणारी संपूर्ण जागा संपादन करणेस तसेच सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पामध्ये पान क्र.डब्ल्यु १५० अ.क्र.४ वर वार्ड क्र.८ मध्ये असलेली र.रू.९.०० लक्ष आणि अ.क्र.७ मध्ये रस्त्यासाठी असलेली र.रू.८.०० लाखाची तरतूद या भूसंपादनावर खर्च करण्यास व भूसंपादनासाठी अर्थसंकल्पात प्रस्तावित तरतूदीतून खर्च करणेस आणि भूसंपादनासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४२/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे, करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| डब्ल्यु १३० | नविन पथदिवे बसविणे | -०.५० लक्ष | ट्युबलर पोलसह पथदिवे बसविणे-२.५० लक्ष |
| डब्ल्यु १३१ | नविन पोल लावणे | -०.५० लक्ष | |
| डब्ल्यु १३२ | जी.आय.पोल लावणे | - ०.५० लक्ष | |
| डब्ल्यु १३६ | विद्युत वायरींग व गार्डन फिटींग करणे | - ०.५० लक्ष | |
| डब्ल्यु १३७ | विद्युत देखभाल दुरूस्ती वॉर्ड इ | - ०.५० लक्ष | |

सुचक : श्री.साहेबराव कावडे अनुमोदक : श्री.रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.७८ चिकलठाणा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|---|
| डब्ल्यु १३० | नविन पथदिवे बसविणे | -०.५० लक्ष | ट्युबलर पोलसह पथदिवे बसविणे-२.५० लक्ष |
| डब्ल्यु १३१ | नविन पोल लावणे | -०.५० लक्ष | |
| डब्ल्यु १३२ | जी.आय.पोल लावणे | - ०.५० लक्ष | |
| डब्ल्यु १३६ | विद्युत वायरींग व गार्डन फिटींग करणे | - ०.५० लक्ष | |
| डब्ल्यु १३७ | विद्युत देखभाल दुरूस्ती वॉर्ड इ | - ०.५० लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ५४३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळांच्या विद्यार्थीसाठी ओळख पत्र द्यावयाचे आहे. ओळखपत्र अद्याप पर्यंत देण्यांत आले नव्हते या शैक्षणिक वर्षा पासून देयाचा असल्याने अंदाजीत खर्च सहा लक्ष पर्यंत अपेक्षीत असून सदरील खर्च शिक्षण विभागाचा लेखा शिर्षका ‘‘शैक्षणिक

साहित्य खरेदी ‘‘ या मधून खर्च करण्यात येईल. वेळ कमी असल्याने औरंगाबाद कॉ-ऑपरेटीव्ह सोसायटी यांच्या कडून खरेदी करण्यात येईल.

करीता धोरणात्मक बाब असल्याने सर्व साधारण सभा मध्ये प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचे विद्यार्थ्यांना ओळख पत्र देण्यासाठीच्या अंदाजीत र.रू.६.०० लक्षच्या खर्चास तसेच सदरील खर्च शिक्षण विभागाचे शैक्षणिक साहित्य खरेदी या लेखा शिर्षकामधून करण्यास आणि कॉ-ऑपरेटीव्ह सोसायटी यांच्याकडून खरेदी करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४४ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, अतिक्रमण विभागाच्या सक्षमीकरण करणे करीता खालील प्रमाणे मशिनरी खरेदी करावयाची आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | जेसीबी मशीन एस्कर्ट मॉडेल | - | २४,८६,७७०/- |
| ०२. | मिनी ट्रक दोन नग | - | १५,५५,७७६/- |
| ०३. | टाटा सुमो स्पेसीओ | - | ४,३९,६८६/- |
| | **एकूण** | **-** | **४४,८२,२३२/-** |

सदरील खर्चास मा.आयुक्त, महोदय यांनी शिफारस केली आहे.

करीता प्रशासकीय विभागाचे सक्षमीकरण करण्यासाठी मशिनरी खरेदीसाठी एकूण र.रू.४४,८२,२३२/- चे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रशासकीय विभागाचे सक्षमीकरण करणेकरीता प्रस्तुत प्रस्तावातील अ.क्र.१ ते ३ प्रमाणे मशिनरी खरेदीसाठी लागणाऱ्या एकूण रक्कम रूपये ४४,८२,२३२/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेकडे दि.०१.०४.२००६ पासून सिडको अधिसूचित क्षेत्राचे हस्तांतरण झालेले आहे. सिडकोतर्फे देण्यांत येणाऱ्या सर्व सेवा सुविधा आता महानगरपालिकेतर्फे देण्यात येत आहेत. या सेवा सुविधा पुरविण्यामध्ये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना माहिती अभावी अडचणी येत आहेत. शासनाच्या अध्यादेशानुसार सिडको भागासाठी महानगरपालिका औरंगाबादतर्फे नियोजन प्राधिकरणाचे काम १ एप्रिल २००६ पासून होत आहे. सिडको आणि औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये झालेल्या हस्तांतरणाच्या करारानुसार एप्रिल २००६ पासून सिडको भागात होणाऱ्या अनधिकृत बांधकामे होऊ न देण्याची जबाबदारी आता महानगरपालिका औरंगाबादवर आहे. या सर्व गोष्टीसाठी सिडकोतील खालील दोन कर्मचाऱ्यांना एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर घेण्यासाठी प्रस्तावास मा.आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. त्या कर्मचाऱ्यांची नावे खालील प्रमाणे आहे.

०१. श्री.जी.आर.साटोटे (सहा.मालमत्ता अधिकारी)

०२. श्री.ठाकुर जी.व्ही. (सहा.कार्यकारी अभियंता विद्युत)

करीता उपरोक्त कर्मचाऱ्यांनी प्रतिनियुक्तीवर मनपा सेवेत येण्यापूर्वी सिडकोचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असून त्यांच्या एक वर्षाचा प्रतिनियुक्तीचा कालावधीत त्यांचे काम समाधानकारक आढळल्यास पूढे त्यांचा प्रतिनियूक्तीचा कार्यकाळ वाढविण्याबाबत विचार करण्यात येईल. तसेच प्रतिनियूक्तीचा कालावधीत शासकीय नियमानुसारच त्यांना वेतन व भत्ते देण्यांत येतील व शासनाच्या अटी शर्ती नुसारच त्यांची प्रतिनियूक्ती करण्यात येईल.

सिडको हस्तांरण महानगरपालिकेकडे झाल्यामूळे महानगरपालिकेचे काम वाढले आहे, सिडकोचा व्याप बराच मोठा आहे. तेथे अधिकारी वर्ग असणे जरूरी आहे. तेथील स्वच्छता व अतिक्रमण या बाबीवर जास्त लक्ष ठेवणे आवश्यक आहे. तसेच विद्युत देखभाल करण्यासाठी एका अधिकाऱ्यांची आवश्यकता

आहे. करीता वरील कर्मचाऱ्यांना एका वर्षाच्या प्रतिनियूक्तीवर सिडको कार्यालयातून औरंगाबाद महानगरपालिकेकडे घेणाचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा आदेशास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडकोतील खालील दोन कर्मचाऱ्यांना एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. श्री.जी.आर.साटोटे (सहा.मालमत्ता अधिकारी)

०२. श्री.ठाकुर जी.व्ही. (सहा.कार्यकारी अभियंता विद्युत)

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,संत एकनाथ रंगमंदीर येथे म्युरल बनविणे व पेंटींग लावणे,पडदे व स्टेज वरील साहित्य बनविणे करीता र.रू.५.०० लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे सदरील कामास्तव तरतुद र.रू.५.०० लक्ष आवश्यक आहे त्यानुसार अर्थसंकल्प सन २००६-०७ पुस्तिका पा.क्र.एम-४९ अ.क्र.१ (ब-२ अग्निशमन विभाग) अन्वये ठेवण्यात आलेली २.०० कोटी रूपयांची तरतुद या आर्थिक वर्षात पुर्णपणे खर्च होणार नसल्याने या तरतुदीमधुन सदरील कामास र.रू.५.०० लक्ष ची तरतुद वळती करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक: श्री.भगवान घडमोडे अनुमोदक:श्रीमती जयश्री किवळेकर,श्री.भाऊसाहेब ताठे,सौ.दिपाली पाटील

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदीर येथे म्युरल बनविणे व पेंटींग लावणे,पडदे व स्टेजवरील साहित्य बनविणे करीताचे र.रू.५.०० लक्षचे अंदाजपत्रकास तसेच अर्थसंकल्प सन २००६-०७ पुस्तिका पा.क्र.एम-४९ अ.क्र.१ (ब-२ अग्निशमन विभाग) अन्वये ठेवण्यात आलेली र.रू.२.०० कोटी मधून सदरील तरतूद वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेची समांतर जलवाहिनी बी.ओ.टी (BOOT) तत्वावर राबविण्याचे ठरविण्यात आलेले आहे. परंतु ह्या पध्दतीने ही योजना राबविल्यास भविष्यात जनतेला पाणीपट्टीच्या वाढीला सामोरे जावे लागणार आहे. पाणीपट्टीत होणारी वाढ फार मोठ्या प्रमाणात असेल. बी.ओ.टी (BOOT) तत्वावर समांतर जलवाहिनी प्रकल्प राबविल्यास विकासक हा स्वत:चा फायदा करूनच ही योजना राबविणार असून 'ना नफा ना तोटा'किंवा जनतेचे हित म्हणजेच सेवाभावनेने ही योजना राबविली जाणार नसून व्यापारी तत्वावर राबविण्यात येईल.

वरील सर्व बाबींचा विचार करून सदर योजना बी.ओ.टी (BOOT) तत्वावर न राबविता महानगरपालिकेच्या आणि शासनाकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातुन राबविण्यात यावी. तसेच सर्वसाधारण सभा दिनांक ११/०८/२००६ विषय क्रमांक -३२२, सर्वसाधारण सभा दिनांक २५/०९/२००६ विषय क्रमांक -४३४ अन्वये केंद्र शासनाकडून लघु व मध्यम शहराच्या भौतीक विकासासाठी असलेल्या योजनेतुन (UIDSSMT) अर्थसहाय्य मिळणेसाठी प्रस्ताव देखील महाराष्ट्र शासनास सादर केलेला असल्याने सदर योजना बी.ओ.टी (BOOT) वर न करता महानगरपालिकेच्या माध्यमातुन राज्यशासन, केंद्रशासन व केंद्रशासनाकडून अर्थसहाय्य उपलब्ध करून आणि महानगरपालिकेच्या निधीमधून समांतर जलवाहिनी योजना राबविण्यात यावी. प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके (पाटील) अनुमोदक : श्री.विजय खुडे श्री.भाऊसाहेब वाघ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेची समांतर जलवाहिनी बी.ओ.टी (BOOT) तत्वावर न राबविता महानगरपालिकेच्या माध्यमातुन, राज्यशासन, केंद्रशासन व केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य उपलब्ध करून आणि महानगरपालिकेच्या निधी मधून समांतर जलवाहिनी योजना राबविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहराचे विकास योजने मध्ये वार्ड क्र.३४ मधील जुने पोस्ट आफिस ते औरंगपुरा प्रणव प्लाजा पर्यंतचा १२ मिटर रूंद विकास योजना रस्ता ताबडतोब भुसंपादनाची कार्यवाही सुरू करून रस्ता विकसीत करून द्यावा तसेच नॅशनल बु-हानी स्कुल अजीम कॉलनीचा रस्ता देखील रूंद करून भुसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यास मंजुरी द्यावी जेणेकरून नागरिकांना ज्याचा फायदा होईल आणि वाहतूक ही सुरळीत होईल. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.सय्यद खुसरो अनुमोदक : सौ.लता दलाल,श्री.विनायक पांडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराचे विकास योजनेमध्ये वार्ड क्र.३४ मधील जुने पोस्ट ऑफिस ते औरंगपुरा प्रणव प्लाजा पर्यंतचा १२ मिटर रूंद विकास योजना रस्ता भुसंपादन करून विकसीत करणेस तसेच नॅशनल बुऱ्हानी स्कुल अजीम कॉलनीचा रस्ता रूंद करून भुसंपादन करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,ब्रिजवाडी येथे म.न.पा. तर्फे श्रीमान माजी नगर सेवक यांच्या प्रयत्नाने हे वाचनालय बांधण्यात आले आहे. नव्याने ब्रिजवाडी वसाहत बसविण्याकरीता ज्या महिलाने दिन रात्र कष्ट केले व ब्रिजवाडीचा विकास घडविण्याकरीता त्यांनी आखे आयुष्य घालवले व त्यांच सोप्न होते की,गोर गरीब नागरीकांना विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ व्हावा. मागसलेल्या समाजास चांगले शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहे. करीता सदर वाचनालयास ''मातोश्री दिवंगत हारणाबाई रगडे'' वाचनालय ब्रिजवाडी म.न.पा.औरंगाबाद असे नांव ब्रॉस मेटल मध्ये टाकण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सुशिला रगडे, श्री.प्रशांत देसरडा

अनुमोदक : श्री.डॉ.भागवत कराड, श्री.भगवान (बापु) घडमोडे, श्री.दामोधर माधवराव शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ब्रिजवाडी येथील महानगरपालिकेच्या वाचनालयास ''मातोश्री दिवंगत हारणाबाई रगडे'' वाचनालय ब्रिजवाडी म.न.पा.औरंगाबाद असे नांव ब्रॉस मेटल मध्ये टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक ANG/१०७३/३५७२/E II/१९७३ दिनांक २३/१०/७३ नुसार 'विद्युत पर्यवेक्षक'या पदाचे नामभिदान बदलून ''कनिष्ट अभियंता (विद्युत)'' करण्यास महाराष्ट्र शासनासने मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेतील विद्यूत पर्यवेक्षक या पदाचे नामाभिदान बदलून ते ''कनिष्ट अभियंता (विद्युत)'' असे करण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रविकांत गवळी अनुमोदक : श्री.संतोष खेंडके,श्री.सीताराम सुरे ,श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतील विद्यूत पर्यवेक्षक या पदाचे नामाभिदान बदलून ते कनिष्ट अभियंता (विद्युत) असे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला हिलाल कॉलनी,आरेफ कॉलनी, लगत खामनदीत अतिक्रमण होत आहे सदरील खामनदी बनेवाडी,राहुलनगर,सादातनगर,पर्यंत जात आहे बनेवाडी,राहुलनगर,सादातनगर,येथे खामनदीतही अतिक्रमण होत आहे. म्हणून मोहल्ला बनेवाडी राहुलनगर, सादातनगर खामनदीच्या रिटनिंग वॉल बांधण्यासाठी ५०,०००००/- (पन्नास लाख)ची तरतुद बॉटणीकल गार्डन हेड मधुन वर्ग करून प्रस्ताव मंजुर व्हावे कारण सध्या बॉटणीकल गार्डनसाठी एक करोड रूपये ची

तरतुद अर्थसंकल्पात आहे व सध्या बॉटणीकल गार्डन तयार करण्याकरीता सध्या फार उशिर झाला आहे सध्या एक करोड खर्च होण्याची शक्यता नाही.

तरी मोहल्ला बनेवाडी,राहुलनगर सादातनगर खामनदी रिटनिंग वॉल बांधण्यासाठी पन्नास लाखाची तरतुदी सह अंदाजपत्रकास सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.अ.साजेद अ.सत्तार अनुमोदक : श्री.स.खुसरो स.बुऱ्हानोद्दीन, श्री.हाजी शेरखान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला बनेवाडी,राहुलनगर सादातनगर खामनदी रिटनिंग वॉल बांधण्यासाठी र.रू.५०,००,०००/- च्या अंदाजपत्रकास बॉटनीकल गार्डनच्या लेखाशिर्षकातून वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद जिल्हा खो-खो संघटना व महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमानाने दि.५ ते ९ डिसेंबर-२००६ औरंगाबाद येथे किशोर-किशोरी या गटाच्या राज्यस्तरीय स्पर्धा आयोजीत करण्यात आलेली आहे. या स्पर्धेत एकुण ४८ संघ सहभागी होणार आहे. सदरील स्पर्धा महानगरपालिका व औरंगाबाद खो-खो संघटना यांचे संयुक्त विद्यमानाने ''महापौर चषक''स्पर्धा म्हणुन घेण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक :श्री.अ.साजेद अ.सत्तार,श्री.भाऊसाहेब वाघ,श्री.राजेश व्यास

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हा खो-खो संघटना व महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमानाने दि.५ ते ९ डिसेंबर-२००६ औरंगाबाद येथे किशोर-किशोरी या गटाच्या राज्यस्तरीय स्पर्धा आयोजीत करण्यात आलेली असल्यामूळे,सदरील स्पर्धा महानगरपालिका व औरंगाबाद खो-खो संघटना यांचे संयुक्त विद्यमानाने ''महापौर चषक''स्पर्धा म्हणुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष दुरूस्त करावे हि विनंती.

| अर्थसंकल्प पान क्र. | कामाचे नांव | दुरूस्त कामाचे नांव |
|---|---|---|
| ३८ | वार्ड क्र.४० रेंगटीपुरा मधील गटार दुरूस्ती करणे. ३.०० लक्ष | वार्ड क्र.४० मधील रेंगटीपुरा येथे नविन गटार बांधणे. ३.०० लक्ष |

सुचक : श्री.कैसर खान अनुमोदक : श्री.नासेर मो.नाहदी, सौ.मोमीन सफीया

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खालील तरतूदीचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान क्र. | कामाचे नांव | दुरूस्त कामाचे नांव |
|---|---|---|
| ३८ | वार्ड क्र.४० रेंगटीपुरा मधील गटार दुरूस्ती करणे. ३.०० लक्ष | वार्ड क्र.४० मधील रेंगटीपुरा येथे नविन गटार बांधणे. ३.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वरील विषयी आपणांस विनंती करण्यात येते की, २० मार्च १९९१ च्या सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक १४४/२ नुसार खालील प्रमाणे ठराव मंजुर करण्यात आलेल्या त्या ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी ऐनवेळी येणारा प्रस्ताव मंजुर करावा व त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे अंमलबजावणी करण्यासाठी मंजुरी द्यावी.

दि.२० मार्च १९९१ च्या सर्वसाधारण सभेत पारीत करण्यात आलेल्या ठरावाचे इतिवृत्तांत पुढील प्रमाणे आहे.

१) नगररचना विभागाकडुन महानगरपालिका हद्दीतील आरक्षणे व खुल्या जागा किती आहेत पुढे महानगरपालिका काही आरक्षणे व खुल्या जागा करणार आहेत काय या बाबतची सविस्तर माहिती व भीमनगर,उस्मानपुरा येथील रस्ता रूंदीकरणाबाबत जो ८० फुटाचा रस्ता होता तो ७० फुट करण्यात आला तर काही ठिकाणी ४० फुट व काही ठिकाणी १५ फुट करून अतिक्रमण करण्यात आले. याबाबतची सविस्तर माहिती १० दिवसापर्यंत सर्व स.सदस्यांना नगररचना विभागाने द्यावी.

२) माहे जानेवारी १९९१ मध्ये संपन्न झालेल्या व विषय क्र.१४४/२ दिनांक २० मार्च १९९१ चे इतिवृत्त बाबत सर्वसाधारण सभेने शहरातील विविध प्रभागातील आरक्षणांची स्थळ पाहणी करण्यासाठी नेमलेल्या समितीचा विविध आरक्षण बाबतचा अहवाल दि.११ एप्रिल १९९१ रोजी सादर केला त्यावर खालीलप्रमाणे अंतिम निर्णय घेण्यात आला.

अहवालातील

| | |
|---|---|
| १) आरक्षण क्र.५० क्षेत्र ०.७५ खुली जागा राजाबार<br>२) आरक्षण क्र.११६ क्षेत्र ३.०० खुली जागा ज्योतीनगर<br>३) आरक्षण क्र.११९ क्षेत्र २.२९ खुली जागा मुस्तफाबाद येथील जागा एका मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेने घर बांधण्यासाठी एकूण मागणी केलेल्या जमीनीपैकी संस्थेला जागा द्यावी. व बाकी उर्वरीत जागा महानगरपालिकेन | } अहवाल सादर केल्यानुसार मंजुरी |

आरक्षीत करावी अशी दुरूस्ती करण्यात येते.

| | |
|---|---|
| ४) आरक्षण क्र.१२१ क्षेत्र ३.२८ खुली जागा शहानुरवाडी<br>५) आरक्षण क्र. १२५ क्षेत्र ९.४१ खुली जागा शहानुरवाडी<br>६) आरक्षण क्र. २७७ क्षेत्र २.२८ पार्क टाऊन हॉल<br>७) आरक्षण क्र. ९१ क्षेत्र १.०० खुली जागा पदमपुरा<br>८) आरक्षण क्र. २५० क्षेत्र ६.६४ खुली जागा भावसिंगपुरा<br>९) आरक्षण क्र. २१७ क्षेत्र १९.०० उद्यान बिबीक मकबराजवळ<br>१०) आरक्षण क्र. १५७ क्षेत्र ५.१२ खुली जागा उल्कानगरी | } अहवाल सादर केल्यानुसार सर्वानुमते मंजुरी |

३) आरक्षण क्र. १५१ ऐवजी १५७ अशी दुरूस्ती संबंधीत ठरावामध्ये करण्यात यावी.

शहर सुधार समितीने ठरविल्यानुसार विषय क्र.१४४/२ च्या इतिवृत्त दि.२० मार्च १९९१ चे पान क्र.९ मध्ये खालील प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्या सहा आरक्षणाच्या जागा आहेत त्या मंजुर शहर विकास योजनेतुन वगळण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन वरील सर्व दुरूस्तीसह दि.२०मार्च ९१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

औरंगाबाद शहराच्या मंजुर विकास योजनेतील जुना आरक्षण क्र.११९ ऐवजी २९७ नविन आरक्षण क्रमांक प्रसिध्दी सुधारीत विकास योजना औरंगाबाद (जुनीहद्द) मौजे मुस्ताफाबाद हे महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये वगळणे व शासनास शिफारस करणेसाठी तसेच वरील ठरावाची अंमलबजावणी करणेसाठी ऐनवेळी येणारा प्रस्ताव आजच्या सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात यावा.

सुचक : श्री.हिम्मतराव साळूबा दाभाडे अनुमोदक : श्री.कैलास गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दि.२० मार्च १९९१ च्या सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक १४४/२ नुसार मंजुर केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करणेस तसेच औरंगाबाद शहराच्या मंजुर विकास योजनेतील जुना आरक्षण क्र.११९ ऐवजी २९७ नविन आरक्षण क्रमांक प्रसिध्दी सुधारीत विकास योजना औरंगाबाद

(जुनीहद्द) मौजे मुस्ताफाबाद हे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये वगळणे व शासनास शिफारस करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७६,७७ विठ्ठलनगर,प्रकाशनगर कडुन येणाऱ्या ड्रेनज लाईनचे डीस्पोजल करिता नविन ३०० मि.मि. व्यासाची एस.डब्ल्यु.जी. पाईप टाकुन मुख्य सिव्हर लाईनला (पुर्वेकडे) जोडणेसाठी र.रू.०५.०० लक्ष तरतुद आवश्यक आहे. वार्ड ई कार्यालयातील जलनि:सारण देखभाल साठी असलेली १० लक्षची तरतुद संपली असल्यामुळे व उपरोक्त काम करणे अत्यावश्यक असल्यामुळे मनपा अर्थसंकल्प सन ०६-०७ पुस्तीका मधील पान क्र.४९ एम नं.०१ (ब-२ अग्निशमन विभाग) अन्वये ठेवण्यात आलेल्या र.रू.०२.०० कोटी च्या तरतुदीमधुन र.रू.०५.०० लक्ष तरतुद सदर कामासाठी वळती करणे करीता प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.भाऊसाहेब वाघ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रभाग क्र.७६,७७ विठ्ठलनगर,प्रकाशनगर कडुन येणाऱ्या ड्रेनज लाईनचे डीस्पोजल करिता नविन ३०० मि.मि. व्यासाची एस.डब्ल्यु.जी. पाईप टाकुन मुख्य सिव्हर लाईनला (पुर्वेकडे) जोडणेसाठी र.रू.०५.०० लक्ष तरतुद अर्थसंकल्प सन ०६-०७ पुस्तीका मधील पा.क्र. ४९ एम नं.०१ (ब-२ अग्निशमन विभाग) अन्वये ठेवण्यात आलेल्या र.रू.०२.०० कोटी च्या तरतुदीमधुन र.रू.०५.०० लक्ष सदर कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात मा.स्थायी समितीने शिफारस केलेली कामे या सदरात पृष्ठ क्रमांक-डब्ल्यु-१५० अनुक्रमांक-१९ वर प्रभाग क्रमांक-३३ येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी र.रू.१० लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे.

सदरील कामांच्या लेखाशिर्षात बदल करून उपरोक्त कामाऐवजी ''गुलमंडी भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे''या कामाची तरतुद करण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय शिरसाट अनुमोदक : श्री.विजय किसनराव खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात मा.स्थायी समितीने शिफारस केलेली कामे या सदरात पृष्ठ क्रमांक-डब्ल्यु-१५० अनुक्रमांक-१९ वर प्रभाग क्रमांक-३३ येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामासाठी र.रू.१० लक्षची करण्यात आलेली तरतुद **त्याऐवजी** गुलमंडी भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, म.न.पा. अर्थसंकल्प २००६-२००७ मधील

१) सिंधी कॉलनी येथील शेवटच्या लाईन मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी भांडवली कामे (जलनि:सारण) अ.क्र.१ पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-११४ वर ३.०० लक्ष रू.तरतुद आहे.या कामा ऐवजी सिंधी कॉलनी येथील शेवटच्या लाईन येथे काँक्रीटींग रस्ता तयार करणे (पेव्हींग ब्लॉक बसविणे)या कामासाठी ३.०० लक्ष रू.तरतुद ठेवण्यात यावेत.

२) सिंधी कॉलनी येथे साईट ड्रेन बसविणे या कामासाठी शहरी भागात खुल्या गटारी बांधणे अ.क्र.१ पृष्ठ क्र.डब्ल्यु-११४ वर ३.०० लक्ष रू.तरतुद केली आहे.त्याऐवजी रमानगर स्मशान भूमीत देखभाल व दुरूस्ती अंतर्गत विविध कामे करणे या कामासाठी ३.०० लक्ष रू.तरतुद ठेवण्यात यावेत.

३) चेतनानगर येथील जुनी ड्रेनेज लाईन काढुन नवीन लाईन टाकणे या कामासाठी जलनि:सारण देखभाल व दुरूस्ती अ.क्र.१२ पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-१२२ वर ३.०० लक्ष रूपये ठेवण्यात आले आहे.तसेच रणजितनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी जलनि:सारण देखभाल व दुरूस्ती अ.क्र.१३ पृष्ठ क्र.डब्ल्यु-१२२ मध्ये २.०० लक्ष तरतुद केली आहे. त्याऐवजी चेतनानगर येथील खुल्या जागेत सांस्कृतिक सभागृह बांधणे या कामासाठी ५.०० लख रू.तरतुद ठेवण्यात यावेत हि विनंती.

सुचक : श्री.मधुकर सावंत अनुमोदक : श्री.संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६-२००७ मधील खालील दर्शविल्याप्रमाणे कामाचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) सिंधी कॉलनी येथील शेवटच्या लाईन मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी भांडवली कामे (जलनि:सारण) अ.क्र.१ पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-११४ वर ३.०० लक्ष रू.तरतुद आहे. या कामा ऐवजी सिंधी कॉलनी येथील शेवटच्या लाईन येथे कॉंक्रीटींग रस्ता तयार करणे (पेव्हींग ब्लॉक बसविणे)या कामासाठी ३.०० लक्ष रू.तरतुद ठेवण्यात यावेत.

२) सिंधी कॉलनी येथे साईट ड्रेन बसविणे या कामासाठी शहरी भागात खुल्या गटारी बांधणे अ.क्र.१ पृष्ठ क्र.डब्ल्यु-११४ वर ३.०० लक्ष रू.तरतुद केली आहे.त्याऐवजी रमानगर स्मशान भूमीत देखभाल व दुरूस्ती अंतर्गत विविध कामे करणे या कामासाठी ३.०० लक्ष रू.तरतुद ठेवण्यात यावेत.

३) चेतनानगर येथील जुनी ड्रेनेज लाईन काढुन नवीन लाईन टाकणे या कामासाठी जलनि:सारण देखभाल व दुरूस्ती अ.क्र.१२ पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-१२२ वर ३.०० लक्ष रूपये ठेवण्यात आले आहे.तसेच रणजितनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी जलनि:सारण देखभाल व दुरूस्ती अ.क्र.१३ पृष्ठ क्र.डब्ल्यु-१२२ मध्ये २.०० लक्ष तरतुद केली आहे. त्याऐवजी चेतनानगर येथील खुल्या जागेत सांस्कृतिक सभागृह बांधणे या कामासाठी ५.०० लख रू.तरतुद ठेवणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्थायी समितीचा ठराव क्रमांक २८९/१५ दि. २९/०९/१९९६ व कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मामअ/१०५४/९६ दि.१०/१०/१९९६ अन्वये जकात नाका बायजीपुरा कार्यालय येथे झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी मंजुरीनुसार झुणका भाकर केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले होते. सदर झुणका भाकर केंद्र दिलेल्या परवानगीनुसार रस्त्याच्या जागेमध्ये येत नाही.जकात नाका परिसरात कुंपण भिंतीच्या आतमध्ये आहे. अलिकडेच महानगरपालिकेने अतिक्रमण हटाव मोहिमे अंतर्गत रस्त्यावरील अतिक्रमणे निष्कषीत करतांना झुणका भाकर केंद्र देखील तोडण्यात आलेले असल्यामुळे संबंधितांना परत त्याच जागेवर दिनांक १०/१०/१९९६ च्या पत्रातील अटी व शर्तीनुसार झुणका भाकर केंद्रासाठी जागा परत देण्याचा प्रस्ताव स्वीकृतीसह मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.बाबासाहेब डांगे, श्री.अनिल जैस्वाल अनुमोदक :श्री.संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जकात नाका बायजीपुरा कार्यालय येथे तोडण्यात आलेले झुणका भाकर केंद्र संबंधितांना परत त्याच जागेवर दिनांक १०/१०/१९९६ च्या पत्रातील अटी व शर्तीनुसार झुणका भाकर केंद्रासाठी जागा परत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत व त्याचा निपटारा करण्यासाठी महानगरपालिकेच्या पॅनलवर अनुभवी विधिज्ञांची आवश्यकता वाटते. व सध्या महानगरपालिकेच्या पॅनलवर कामाच्या प्रमाणात विधिज्ञांची संख्या कमी असल्याने पॅनलवर जास्तीचे

विधिज्ञ घेणे आवश्यक असल्याने श्री.प्रविण सांगवीकर व श्री.राजू सांडुलाल पहाडीया यांना महापालिकेच्या पॅनलवर घेण्यासाठी नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव स्वीकृतीसह मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.विनायक पांडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेची अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत व त्याचा निपटारा करण्यासाठी श्री.प्रविण सांगवीकर व श्री.राजू सांडुलाल पहाडीया यांना महानगरपालिकेच्या पॅनलवर विधिज्ञ म्हणून घेण्यासाठी नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक शहर असुन,या शहराचा क्रीडा,सांस्कृतिक,सामाजिक वारसा अखंड पण चालत आलेला आहे. क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना त्यांच्या कलागुणा मध्ये वाढ होण्यासाठी साहजिकच विविध खेळांचे योग्य प्रशिक्षण देणे गरजेचे आहे,जेणे करून औरंगाबाद शहराच्या नावलौकीकात भर पडेल.

त्यादृष्टीने दिनांक १७ सप्टेंबर २००६ रोजी औरंगाबाद शहरात संपन्न झालेल्या अखिल भारतीय महापौर चषक फुटबॉल स्पर्धा ह्या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मा.महापौर यांनी औरंगाबाद शहरामध्ये क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी क्रीडा अकादमीची स्थापना करण्यात येईल अशी घोषणा केली होती.औरंगाबाद शहरात ''औरंगाबाद क्रीडा अकादमीची'' स्थापना झालेली असुन, क्रीडा अकादमी तर्फे खेळाडूंना विविध खेळांचे योग्य प्रशिक्षण देण्यासाठी साहजिकच आर्थिक दृष्ट्या सबल करण्यासाठी महानगरपालिकेच्या फंडातून क्रीडा विभागाच्या उपलब्ध निधीतून रूपये ०३ लक्ष प्रतिवर्षी आर्थिक सहाय्य देण्याच्या हेतुन मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.संजय शिरसाट

अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल,श्री.बाबासाहेब डांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरात स्थापन झालेल्या क्रीडा अकादमीसाठी व क्रीडा अकादमी तर्फे खेळाडूंना विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यासाठी महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाच्या उपलब्ध निधीतून र.रू.३.०० लक्ष प्रतिवर्षी आर्थिक सहाय्य देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,प्रभाग क्र.९२ मधील विविध कामाकरीता खालील प्रमाणे तरतुद करण्यात आलेली आहे. सदरील कामाचे लेखाशिर्ष बदलून माझ्या प्रभागातील खालील कामे करण्याच्या प्रस्तावास मंजुरी द्यावी.

१. सन २००६-०७ च्या अर्थ संकल्पामधील पान क्र.डब्ल्यु-१८४, वार्ड क्र.९२ अंतर्गत जलवाहिनी टाकणे रू.२.००लक्षची तरतुद आहे. त्याऐवजी मिलिंद नगर येथे कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे. रू.२.०० लक्ष तरतुद प्रमाणे.

२. सन २००६-०७ च्या अर्थ संकल्पामधील पान क्र.डब्ल्यु-१८० वार्ड क्र.९२ अंतर्गत विद्युतीकरण करणे रू.२.०० लक्ष ची तरतुद आहे. त्याऐवजी नागसेननगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर पत्र्याचे शेड तयार करणे.रू.२.०० लक्ष तरतुद प्रमाणे.

३. सन २००६-०७ च्या अर्थ संकल्पामधील पान क्र.डब्ल्यु-१५२, वार्ड क्र.९२ अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे रू.५.०० लक्ष ची तरतुद आहे. त्याऐवजी वार्ड क्र.९२ मिलिंदनगर येथे कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे. रू.५.०० लक्ष तरतुद प्रमाणे.

४. सन २००६-०७ च्या अर्थ संकल्पामधील पान क्र.डब्ल्यु-१४३, वार्ड क्र.९२ मध्ये नागसेननगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोरील दुरूस्ती, ब्लॉक बसविणे,रू.१.०० लक्ष ची तरतुद

आहे. त्याऐवजी वार्ड क्र.९२ कबीरनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास समोर पत्र्याचे शेड तयार करणे. रू.१.०० लक्ष तरतुद प्रमाणे.

५. सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पामधील पान क्र.डब्ल्यु-२९,वार्ड क्र.९३ अंतर्गत महिलांसाठी सार्वजनिक सुलभ शौच्छालय रू.७.०० लक्ष ची तरतुद आहे. त्याऐवजी वार्ड क्र.९२ मधील नागसेननगर, मिलिंदनगर येथे कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे रू.७.०० लक्ष तरतुद प्रमाणे.

सुचक : श्री.के.व्ही.मोरे अनुमोदक : श्री.हिम्मतराव दाभाडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रभाग क्र.९२ मधील विविध कामाकरीता खालील प्रमाणे असलेल्या तरतुदीचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. सन२००६-०७च्या अर्थसंकल्पातील पानक्र.W-१८४,वार्डक्र.९२अंतर्गत जलवाहिनीटाकणे रू.२.०० लक्षची तरतुद आहे. त्याऐवजी मिलिंद नगर येथे कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे. रू.२.०० लक्ष तरतुद प्रमाणे.

२. सन २००६-०७ च्या अर्थ संकल्पामधील पान क्र.डब्ल्यु-१८० वार्ड क्र.९२ अंतर्गत विद्युतीकरण करणे रू.२.०० लक्ष ची तरतुद आहे. त्याऐवजी नागसेननगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर पत्र्याचे शेड तयार करणे.रू.२.०० लक्ष तरतुद प्रमाणे.

३. सन २००६-०७ च्या अर्थ संकल्पामधील पान क्र.डब्ल्यु-१५२, वार्ड क्र.९२ अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे रू.५.०० लक्ष ची तरतुद आहे. त्याऐवजी वार्ड क्र.९२ मिलिंदनगर येथे कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे. रू.५.०० लक्ष तरतुद प्रमाणे.

४. सन २००६-०७ च्या अर्थ संकल्पामधील पान क्र.डब्ल्यु-१४३, वार्ड क्र.९२ मध्ये नागसेननगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासमोरील दुरूस्ती, ब्लॉक बसविणे,रू.१.०० लक्ष ची तरतुद आहे. त्याऐवजी वार्ड क्र.९२ कबीरनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास समोर पत्र्याचे शेड तयार करणे. रू.१.०० लक्ष तरतुद प्रमाणे.

५. सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पामधील पान क्र.डब्ल्यु-२९,वार्ड क्र.९३ अंतर्गत महिलांसाठी सार्वजनिक सुलभ शौच्छालय रू.७.०० लक्ष ची तरतुद आहे. त्याऐवजी वार्ड क्र.९२ मधील नागसेननगर, मिलिंदनगर येथे कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे रू.७.०० लक्ष तरतुद प्रमाणे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,क्रांतीचौक ते चिकलठाणा ह्या रस्त्यास ''छत्रपती शिवाजी महाराज महामार्ग'' असे नांव देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक : श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,क्रांतीचौक ते चिकलठाणा ह्या रस्त्यास ''छत्रपती शिवाजी महाराज महामार्ग'' असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५६३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००६-२००७ मध्ये अर्थसंकल्पामध्ये विकास कामाची तरतुद करण्यात आलेली होती. प्रभाग क्र.३८ अंगुरीबाग भुखंडावर पेव्हींग ब्लॉक बसविणे साठी रू.१,०००००/- एक लाख पान क्र.डब्ल्यु-५७ हे काम इमारती व उद्यान बांधकामाकडुन काढून अतिरिक्त शहर अभियंताकडे देण्यात यावे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर

सुचक : श्री.संजु रिडलॉन अनुमोदक :श्री.शशांक विसपुते

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००६-२००७ मध्ये अर्थसंकल्पामध्ये प्रभाग क्र.३८ साठी अंगुरीबाग येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी करण्यात आलेली र.रू.१,०००००/- एक लाख पान क्र.डब्ल्यु-५७ हे काम इमारती व उद्यान बांधकामाकडुन काढून अतिरिक्त शहर अभियंताकडे देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,माणकनगर येथे खडीकरण व नाथप्रांगण येथील रस्त्याचे खडीकरण करणे आवश्यक आहे .सदर कामासाठी अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु-१३५ रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क ह्या हेडमधुन असलेल्या रू.१०,०००००/-मधुन तरतुद वळती करून सदरचे काम करणे बाबत सर्वसाधारण सभेचा ठराव घ्यावा ही विनंती.

सुचक : श्री.शशांक विसपुते अनुमोदक : श्री.रेणुकादास वैद्य, श्री.संजय रिडलॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, माणकनगर येथे खडीकरण व नाथप्रांगण येथील रस्त्याचे खडीकरण करणे करीता अर्थसंकल्पात पान क्र.डब्ल्यु-१३५ रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क ह्या लेखाशिर्षामध्ये असलेल्या र.रू.१०,०००००/-मधुन तरतुद वळती करून सदरचे काम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पा.क्र.डब्ल्यु-१६९ अ.क्र.७ वरील वार्ड क्र.१८ मध्ये जलनि:सारण वाहीनी टाकणे रक्कम ५ लाख हे काम आहे. त्यामधुन ७५ हजार रूपये एम-२ मधील जैन मंदिराच्या बाजुला १५ फुट रोड तयार करणे हे काम करण्यात यावे.

सुचक : श्री.प्रकाश अत्तरदे अनुमोदक : श्री.सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पा.क्र.डब्ल्यु-१६९ अ.क्र.७ वरील वार्ड क्र.१८ मध्ये जलनि:सारण वाहीनी टाकणे रक्कम ५ लाख हे काम आहे. त्यामधुन ७५ हजार रूपये एम-२ मधील जैन मंदिराच्या बाजुला १५ फुट रोड तयार करणे हे काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.४७ सिडको एन-६,प्र.क्र.४७ अंतर्गत जलवाहिनी टाकणे अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.१८८ वर अनु.क्र.६, रू.५ लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यापैकी ३ लक्ष रू. एन-६,वार्ड क्र.४७ कुलस्वामीनी मंगल कार्यालयामागे गटार बनविणे साठी वळती करण्यात यावी. जेणे करून तेथील नागरीकांना सांडपाण्याची व पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी सोय होईल.

करीता सदरील लेखाशिर्षक बदलण्यात यावे .

सुचक : सौ.छाया विलास राऊत अनुमोदक : सौ.शोभा हरिश्चंद्र मिटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४७ सिडको एन-६,प्र.क्र.४७ अंतर्गत जलवाहिनी टाकणे अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.१८८ वर अनु.क्र.६, र.रू.५.०० लक्षची करण्यात आलेल्या तरतुदीतून र.रू.३.०० लक्ष एन-६,वार्ड क्र.४७ कुलस्वामीनी मंगल कार्यालयामागे गटार बनविणे साठी वळती करण्यास व लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कार्यालय मनपा परिपत्रक क्र.मनपा/कावि/५२/२००६, दि.२४.०४.०६,व परि क्र.मनपा/कावि/८४/०६, दि.०९/६/०६ आणि मनपा /कावि/११०/ ०६, दि.११/०७/०६ अन्वये मनपाच्या वर्ग-२,वर्ग-३ कर्मचाऱ्यांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत आहे. त्या योजनेमध्ये माझ्या प्रभागातील परिपत्रकावरील क्र.१२ हिंदुस्थान अवास मधील बांधकाम पुर्ण असलेल्या घरांचा उल्लेख आहे.बांधुन पुर्ण असलेले घरे तसेच क्र.१३ दिशा बिल्डर्सच्या मोकळ्या जागेत क्र.११ वर श्रीनिवास बिल्डर्स कांचनवाडी या मोकळ्या जागेत प्रस्तावित आहे.

तरी सदरील प्रस्तावान्वये प्रस्तावित तिन्ही जागा वगळुन परिपत्रक अंतिम करावे.करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक :श्री.भाऊसाहेब वाघ, श्री.गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यालय मनपा परिपत्रक क्र.मनपा/कावि/५२/२००६, दि.२४.०४.०६,व परि क्र.मनपा/कावि/८४/०६, दि.०९/६/०६ आणि मनपा /कावि/११०/ ०६, दि.११/०७/०६ अन्वये मनपाच्या वर्ग-२,वर्ग-३ कर्मचाऱ्यांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत असलेल्या योजनेमध्ये प्रभाग क्र.९८ मधील प्रस्तुत प्रस्तावातील परिपत्रकावरील अ.क्र.१२ हिंदुस्थान अवास,अ.क्र.१३ दिशा बिल्डर्सच्या मोकळ्या जागेत तसेच अ.क्र.११ वर श्रीनिवास बिल्डर्स कांचनवाडी या प्रस्तावित तिन्ही जागा वगळुन घरकुल योजनेचे परिपत्रक अंतिम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५४ संजयनगर या प्रभागाकरीता अर्थसंकल्प २००६-०७ पान क्र.डब्ल्यु-१८४ प्र.क्र.५४ अर्धगोल जलवाहीनी टाकणे र.रू.४.०० लक्ष (चार लक्ष)
या कामाऐवजी संजयनगर येथे विविध ठिकाणी ३०० मीमी व्यासाची नविन ड्रेनेज लाईन टाकणे.

सुचक : श्री.संतोष जेजुरकर                    अनुमोदक : श्री.संतोष खेंडके

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५४ संजयनगर या प्रभागाकरीता अर्थसंकल्प २००६-०७ पान क्र.डब्ल्यु-१८४ वर अर्धगोल जलवाहीनी टाकणे र.रू.४.०० लक्ष (चार लक्ष) असलेली तरतूद **याकामाऐवजी** संजयनगर येथे विविध ठिकाणी ३०० मीमी व्यासाची नविन ड्रेनेज लाईन टाकणे. असे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,अर्थसंकल्पातील कामामध्ये फेरबदल करणे बाबत.

| अ. क्र. | मुळकाम | बदल करावयाचे काम |
|---|---|---|
| १ | डब्ल्यु ७६-५ महेशनगर विद्यानिकेतन भागात गटारी खाली असलेली जलवाहिनी स्थलांतरीत करणे रू.२ लक्ष | अहिंसा नगर भागात १५० मीटर मोठ्या व्यासाची जलवाहिनी टाकणे-रू.२ लक्ष |
| २ | डब्ल्यु १८-२१ वार्ड ५०सुराणानगर ते बदक चौक पर्यंत सौंदर्यीकरण करणे-रू.१२ लक्ष | वार्ड ५० सुराणानगर भागात विविध जागी डांबरीकरण करणे-रू.१२ लक्ष |
| ३ | डब्ल्यु १४०-११ श्री.वाहुळ यांच्या घरापासुन मनपा सभागृहा पर्यंत नाल्यावर स्लॅब टाकणे रू.५ लक्ष | वार्ड ५० सुराणानगर भागात विविध जागी मजबुती करण व डांबरी करण करणे.<br>रू.५ लक्ष |
| ४ | डब्ल्यु १४९-१५ वार्ड ५० सुराणानगर येथे अभ्यासीका विकसीत करणे रू.५ लक्ष | वार्ड ५० महेश नगर येथील उद्यान विकसीत करणे. रू.५ लक्ष |

कृपया उपरोक्त कामाचा बदल करावा हि विनंती.

सुचक :श्री.प्रशांत देसरडा                    अनुमोदक : श्री.संजु रिडलॉन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील कामामध्ये खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | मुळकाम | बदल करावयाचे काम |
|---|---|---|
| १ | डब्ल्यु ७६-५ महेशनगर विद्यानिकेतन भागात गटारी खाली असलेली जलवाहिनी स्थलांतरीत करणे रू.२ लक्ष | अहिंसा नगर भागात १५० मीटर मोठ्या व्यासाची जलवाहिनी टाकणे-रू.२ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| २ | डब्ल्यु १८-२१ वार्ड ५०सुराणानगर ते बदक चौक पर्यंत सौंदर्यीकरण करणे-रू.१२ लक्ष | वार्ड ५० सुराणानगर भागात विविध जागी डांबरीकरण करणे-रू.१२ लक्ष |
| ३ | डब्ल्यु १४०-११ श्री.वाहुळ यांच्या घरापासुन मनपा सभागृहा पर्यंत नाल्यावर स्लॅब टाकणे रू.५ लक्ष | वार्ड ५० सुराणानगर भागात विविध जागी मजबुती करण व डांबरी करण करणे. रू.५ लक्ष |
| ४ | डब्ल्यु १४९-१५ वार्ड ५० सुराणानगर येथे अभ्यासीका विकसीत करणे रू.५ लक्ष | वार्ड ५० महेश नगर येथील उद्यान विकसीत करणे. रू.५ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.५७ मधील कार्यालय (क) जाफरगेट येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे साठी सर्वसाधारण सभा दि.१३.१०.०६ रोजी विषय क्र.५३३ नुसार रू.१० लक्षची तरतुद करण्यात आली होती. सदरील कामाचे अंदाज पत्रक ९ लक्ष रू.चे तयार झाले आहे. करीता उर्वरीत रक्कम रू.१ लक्षची तरतुद खालील कामासाठी करण्यात यावी.

०१. वार्ड क्र.५७ मध्ये विविध ठिकाणी जी.आय.पोल टाकणे. (२५ हजार रू.)
०२. तक्षशिला नगर (स्लम) येथे थ्री सेट लावणे. (२५ हजार रू.)
०३. वार्ड क्र.५७ तक्षशिला नगर येथे टु सेट लावणे. (२५ हजार)
०४. वार्ड क्र.५७ येथे विविध मेटेलिक लाईट लावणे. (२५ हजार)

सुचक : श्री.त्र्यंबक तुपे अनुमोदक : श्री.दामोधर शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५७ मधील कार्यालय (क) जाफरगेट येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे,सर्वसाधारण सभा दि.१३.१०.०६ रोजी विषय क्र.५३३ नुसार र.रू.१०.०० लक्षची तरतुद करण्यात आली होती. सदरील कामाचे अंदाज पत्रक र.रू.९.०० लक्षचे तयार झाले असल्यामूळे, उर्वरीत रक्कम रू.१.०० लक्षची तरतुद खालील कामासाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. वार्ड क्र.५७ मध्ये विविध ठिकाणी जी.आय.पोल टाकणे. (२५ हजार रू.)
०२. तक्षशिला नगर (स्लम) येथे थ्री सेट लावणे. (२५ हजार रू.)
०३. वार्ड क्र.५७ तक्षशिला नगर येथे टु सेट लावणे. (२५ हजार)
०४. वार्ड क्र.५७ येथे विविध मेटेलिक लाईट लावणे. (२५ हजार)

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००६-२००७ मधील वार्ड क्रमांक ९१ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे संदर्भात एकूण १० लाखची तरतुद ठेवण्यात आली आहे.अ.क्र.५१ पान क्र.डब्ल्यु-१५८

त्या पैकी ५ लाख माझे वार्डात विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे संदर्भात ट्रान्सफर करण्यात यावे ही विनंती.

सुचक : श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय अनुमोदक : श्री.मुजीब आलमशा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००६-२००७ मधील वार्ड क्रमांक ९१ मध्ये ड्रेनेज लाईन टाकणेसाठी अ.क्र.५१ पान क्र.डब्ल्यु-१५८ ठेवण्यांत आलेल्या र.रू.१०.०० लाखाच्या तरतुदीतून र.रू.५.०० लाख वार्डात विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका मुख्य इमारतीमध्ये सध्या कार्यरत असलेला बी.करमसिंग ओबेरॉय हॉलचे आधुनिकीकरण व सुशोभिकरण बिल्डींग फंड या शिर्षकातुन करण्यात यावे.

सुचक : श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय अनुमोदक : श्री.मुजीब आलमशा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका मुख्य इमारतीमध्ये सध्या कार्यरत असलेला बी.करमसिंग ओबेरॉय हॉलचे आधुनिकीकरण व सुशोभिकरण बिल्डींग फंड या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्थायी समिती ठराव क्र.९०/४८ दिनांक १०.०७.९८ व कार्यालयीन पत्र जा.क्र.मनपा/मामअ/८३१/९८, दिनांक २४.०७.९८ अन्वये मिलींद चौक परीसर, लिटल फ्लॉवर स्कुल जवळ झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी मंजुरीनुसार झुणका भाकर केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले होते. सदर झुणका भाकर केंद्र दिलेल्या परवानगीनुसार रस्त्याच्या जागेमध्ये व रहदारीस कूठलाही अडथळा नसतांना चालविण्यात येत होते. तथापी अलिकडेच महानगरपालिकेने अतिक्रमण हटाव मोहीमे अंतर्गत रस्त्यावरील अतिक्रमणे निष्काशीत करतांना झुणका भाकर केंद्र देखील तोडण्यात आलेले असल्यामूळे संबंधीतांना परत त्याच जागेवर दिनांक २४.०७.९८ च्या पत्रातील अटी व शर्तीनुसार झुणका भाकर केंद्रासाठी जागा त्वरीत परत करून त्याच जागेवर पक्क्या बांधकामाची परवानगी देणेसह प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.पुनमचंद बमणे अनुमोदक : सौ.रजनी जोशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलींद चौक परीसर, लिटल फ्लॉवर स्कुल जवळील तोडण्यात आलेले झुणका भाकर केंद्र दिनांक २४.०७.९८ च्या पत्रातील अटी व शर्तीनुसार परत करणेस व त्याच जागेवर पक्क्या बांधकामाची परवानगी देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये वॉर्ड क्र.९ करीता पान क्र.डब्ल्यु २४ अ.क्र.१० वर र.रू.७.०० लक्ष तुली अपार्टमेंट ते नानजकर यांचे घरापर्यंत दोन्ही बाजूस पेव्हर ब्लॉक बसविणेसाठी तरतूद ठेवण्यात आलेली आहे. तथापी सदरील काम करणे आवश्यक नसल्यामूळे सदर रक्कम रू.७.०० लक्ष वॉर्ड क्र.९ नंदनवन कॉलनी येथील मनपाचे मुख्य गार्डनमध्ये सध्या सुरू असलेल्या संगीत कारंजेच्या कामाकरीता वळती करणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये वॉर्ड क्र.९ करीता पान क्र.डब्ल्यु २४ अ.क्र.१० वर ठेवण्यात आलेली तरतूद र.रू.७.०० लक्ष **याऐवजी** सदरील तरतूद र.रू.७.०० लक्ष वॉर्ड क्र.९ नंदनवन कॉलनी येथील मनपाचे मुख्य गार्डनमध्ये सध्या सुरू असलेल्या संगीत कारंजेच्या कामाकरीता वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००६-०७ मधील पान क्र.डब्ल्यु-१४० वर अनुक्रमांक ८ वर वार्ड क्र.८९ मंजुर रेखांकनातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे साठी ०५ लाखाची तरतुद करण्यात आलेली त्या ऐवजी वार्ड क्र.८९ मधील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण (पुनरडांबरीकरण)करणे साठी रू.०५.०० लक्ष तरतुद करणेचा लेखाशिर्ष बदलणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

तसेच पान क्र.डब्ल्यु-१४६ वर अनु क्र.०४ वर ज्योतीनगर येथील काव्य उद्यान विकसित करणे या कामासाठी र.रू.०४ लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. सन २००५-२००६ मध्ये असलेल्या तरतुदीतुन काम सुरू असुन तरतुद असलेली रक्कम कमी पडत असल्याने या कामासाठी उपरोक्त सन २००६-०७ च्या तरतुदीमधुन उर्वरीत कामे करण्यासाठी सदरील रक्कम रू.०४.०० लक्ष वळती करणेच्या मंजुरीस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विजया रहाटकर अनुमोदक : सौ.लता दलाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प २००६-०७ मधील पान क्र.डब्ल्यु-१४० वर अ.क्र.८ वर वार्ड क्र.८९ मंजुर रेखांकनातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे साठी असलेली र.रू.५.०० लाखाची तरतुद **याऐवजी** वार्ड क्र.८९ मधील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण (पुनरडांबरीकरण)करणे साठी र.रू.५.०० लक्ष तरतुद असे लेखाशिर्ष बदलणेस तसेच पान क्र.डब्ल्यु-१४६ वर अनु क्र.०४ वर ज्योतीनगर येथील काव्य उद्यान विकसित करणे या कामासाठी असलेली र.रू.४.०० लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. सन २००५-२००६ मध्ये असलेल्या तरतुदीतुन काम सुरू असुन तरतुद असलेली रक्कम कमी पडत असल्याने या कामासाठी उपरोक्त सन २००६-०७ च्या तरतुदीमधुन उर्वरीत कामे करण्यासाठी सदरील रक्कम रू.४.०० लक्ष वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, उप अभियंता या संवर्गातील व इतर वर्ग-२ संवर्गातील अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामकाजासाठी वाहन अनुज्ञेय आहेत. तथापी वाहनाची कमतरता असल्यामुळे महानगरपालिकेतर्फे कार्यालयीन कामासाठी महानगरपालिकेचे वाहन न देता चारचाकी वाहन खरेदीसाठी रू.२ लक्ष कर्ज ६% व १४% व्याज दराने वितरीत करण्यात आलेले आहे व त्याची परतफेड चालू आहे.

वाहन कर्ज देतांना काहीना ६% व्याज दराने व काहीना १४% व्याज दराने कर्ज दिल्यामुळे अधिकारी संवर्गामध्ये असंतोष दिसून येतो व व्याजाचा समान दर न आकारणे हे नैसर्गिक न्याय तत्वाविरूध्द आहे. तसेच आजच्या परिस्थितीमध्ये वाहनासाठी आम जनतेला बँकामार्फत ५ ते ६% व्याज दराने कर्ज पुरवठा होतो त्या तुलनेत महानगरपालिका अधिकाऱ्यांना आकारणी होत असलेला व्याज दर हा प्रचलित व सद्य:स्थितीत जास्त आहे. अशा अधिकाऱ्यांना महानगरपालिकेतर्फे कर्ज दिले नसते तर महानगरपालिकेला तेवढ्याच रक्कमेची किंबहूना त्यापेक्षा जास्त रक्कमेची गुंतवणूक करून वाहन उपलब्ध करून द्यावे लागले असते. शिवाय त्यावर इंधन खर्च,वाहन चालकाचा पगार, वाहनाची देखभाल दुरूस्ती,विमा इ.खर्च महानगरपालिकेला करावा लागला असता. आज फक्त रू.१८००/- प्रति महा इंधन खर्च म्हणून देण्यात येतो.

या सर्व बाबींचा विचार करता वाहन कर्जासाठी दिलेल्या संपूर्ण रक्कमेवर व्याज माफ करून फक्त मुद्दल रक्कमेची वसूली करण्याकरीता प्रस्ताव सर्व साधारण सभेच्या स्वीकृतीसह मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.भगवान घडमोडे,श्री.रेणुकादास वैद्य अनुमोदक : श्री.संजय शिरसाट,श्री.अ.साजेद अ.सत्तार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उप अभियंता या संवर्गातील व इतर वर्ग-२ संवर्गातील अधिकाऱ्यांना महानगरपालिकेतर्फे कार्यालयीन कामासाठी महानगरपालिकेचे वाहन न देता चारचाकी वाहन खरेदीकरीता देण्यात आलेल्या वाहन कर्जासाठीच्या संपूर्ण रक्कमेवर व्याज माफ करून, मुद्दल रक्कमेची वसूली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५७७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१९ मधील रायगडनगर सिडको येथील जिजाऊ उद्यानात राजमाता जिजाऊ आणि बाल शिवाजी यांचा पुर्णाकृती पुतळा, तसेच रायगडनगर मधील सांस्कृतिक सभागृहाचा नाम फलक तयार करणे व या नाम फलकाच्या कमानीवर संत तुकाराम महाराज यांचा पुतळा महानगरपालिकेतर्फे बसविण्याचे कामाकरीता रक्कम रू.१४.५ लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील रक्कम दिनांक १३.१०.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.५२९ मधील प्रभाग क्र.१९ मधील शिवनेरी कॉलनी मधील पार्वती कन्या शाळेपासून ते एन-१० पर्यंत मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकण्याकरीता केलेली १४.५ लक्षाची तरतूद रद्द करून सदरील रक्कम उपरोक्त कामाकरीता वापरण्यासाठी लेखाशिर्षक बदलाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

तसेच वार्ड क्र.१९ मधील रायगडनगर सिडको येथील उद्यानात राजमाता जिजाऊ आणि बाल शिवाजी यांचा पुर्णाकृती पुतळा, तसेच रायगडनगर मधील सांस्कृतिक सभागृहाच्या नाम फलकाच्या कमानीवर संत तुकाराम महाराज यांचा पुतळा महानगरपालिकेतर्फे बसविण्यात यावा.

तसेच वॉर्ड क्र.१९ एन-९ आर-२६ रायगडनगर म्हाडा कॉलनी येथील उद्यानाच्या कामासाठी रू.२.०० लक्षची आवश्यकता असल्याने याच वॉर्डातील मनपा अर्थसंकल्प २००६-०७ मधील पान क्र.डब्ल्यु -१६९ वरील वॉर्ड क्र.१९ मध्ये जलनिस्सारण वाहीन्या टाकणे या कामाच्या तरतूदीमधून रू.२.०० लक्ष वरील कामासाठी वळती करून लेखाशिर्ष बदलण्यास मंजूरी देण्यांत यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.अनिल जैस्वाल अनुमोदक : श्री.नासेर नाहदी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१९ मधील रायगडनगर सिडको येथील जिजाऊ उद्यानात राजमाता जिजाऊ आणि बाल शिवाजी यांचा पुर्णाकृती पुतळा, तसेच रायगडनगर मधील सांस्कृतिक सभागृहाचा नाम फलक तयार करणे व या नाम फलकाच्या कमानीवर संत तुकाराम महाराज यांचा पुतळा महानगरपालिकेतर्फे बसविण्याचे कामाकरीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.१४.५ लक्षचे अंदाजपत्रकास आणि सदरील रक्कम दिनांक १३.१०.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.५२९ मधील प्रभाग क्र.१९ शिवनेरी कॉलनी मधील पार्वती कन्या शाळेपासून ते एन-१० पर्यंत मोठ्या व्यासाची जलवाहीनी टाकण्याकरीता केलेली तरतूद र.रू.१४.५ लक्षाचे लेखाशिर्ष बदलणेस तसेच वार्ड क्र.१९ मधील रायगडनगर सिडको येथील उद्यानात राजमाता जिजाऊ आणि बाल शिवाजी यांचा पुर्णाकृती पुतळा, तसेच रायगडनगर मधील सांस्कृतिक सभागृहाच्या नाम फलकाच्या कमानीवर संत तुकाराम महाराज यांचा पुतळा महानगरपालिकेतर्फे बसविण्यास आणि वॉर्ड क्र.१९ एन-९ आर-२६ रायगडनगर म्हाडा कॉलनी येथील उद्यानाच्या कामासाठी र.रू.२.०० लक्षची आवश्यकता असल्याने याच वॉर्डातील मनपा अर्थसंकल्प २००६-०७ मधील पान क्र.डब्ल्यु -१६९ वरील वॉर्ड क्र.१९ मध्ये जलनिस्सारण वाहीन्या टाकणे या कामाच्या तरतूदीमधून र.रू.२.०० लक्ष वरील कामासाठी वळती करून लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच ''राष्ट्रगिताने '' सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका, औरंगाबाद